# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष पहिले ▮ अंक बारावा ▮ सप्टेंबर २०२३




## दहा वर्षे खुनाची
## कार्यरत विवेकी असंतोषाची

# शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिजागर

दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला पुणे येथील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर महा. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी स्मृतिजागर आणि अभिवादन केले. महा. अंनिसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येच्या तपासाच्या अनास्थेचा उपस्थितांनी तीव्र शब्दात निषेध केला.







मानव कांबळे, कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्यभरातून आलेले पदाधिकारी, कार्यकर्ते मशाल पेटवून स्मृतिजागर करताना.







डॉ. दाभोलकरांना अभिवादन करताना भाई अविनाश पाटील, कार्याध्यक्ष माधव बावगे, ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई, संजय बनसोडे, विनायक सावळे व कार्यकर्ते




प्रा. सुभाष वारे अभिवादन करताना




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलापासून एस.एम.जोशी सभागृहापर्यंत मूक मोर्चा

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे**
**मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष पहिले । अंक बारावा**
**सप्टेंबर २०२३**

## अनुक्रमणिका

- **संपादकीय** ४
- **विचारमंथन**
  भारत आपली कूस बदलतोय / किशोर बेडकिहाळ ५
  विवेकी समाजनिर्मितीसाठी कार्यरत राहूया / डॉ. बी. एम. हिर्डेकर १३
- **प्रासंगिक**
  भारतीय संविधान निर्मितीतील महिला शिलेदारः दुर्गाबाई देशमुख/डॉ. तृप्ती थोरात १५
- **बुवाबाजी**
  भुताळा-डाकीण आरोपातून वृद्ध दाम्पत्याची मुक्तता / डॉ. टी. आर. गोराणे १६
- **समाजभान**
  ...तर तुमच्यासाठी बोलायला कोणीच उरणार नाही! / यशवंती शिंदे १८
- **व्यक्ती विशेष**
  कर्मवीर भाऊराव पाटील आणि समाजसुधारणा / डॉ. धनाजी मासाळ २१
- **पुस्तक परिचय**
  वयात येताना... स्वतःला जाणूया! / डॉ. भगवान फाळके २४
- **आदरांजली**
  परिवर्तनवादी विचारवंत : प्रा.हरी नरके / डॉ. आ. ह. साळुंखे २७
  सर, तुम्ही अजून हवे होतात... / प्रा. परेश शाह २८
- **जडणघडण**
  निबंध स्पर्धा आणि माझा अंनिसमधील प्रवेश / प्रकाश कांबळे ३०
- **महा. अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३२
- **गणितप्रेमी** /रमेश रहाळकर ३७
- **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhashradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

विज्ञान निर्भयता नीती

## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे

- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली-४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in

- **अंक वितरण**
  अरबाज पटेल
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर

- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

# ।। संपादकीय ।।

## सत्यशोधक समाजाचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव

म. फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात केली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेस या वर्षी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने सत्यशोधक समाजाची विचारधारा, वाटचाल, इतिहास, कार्य, योगदान व आजची प्रस्तुतता आदी बाबींची चिकित्सा होणे गरजेचे आहे. परंतु महाराष्ट्रभर या दृष्टीने फारसे मंथन झालेले आढळून येत नाही.

सत्यशोधक समाजाचा मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे होता, ''ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यांस मुक्त करण्याकरिता काही सूज्ञ शूद्र मंडळींनी हा समाज स्थापन केला.''

सत्यशोधक समाजाचे काम उत्तरोत्तर व्यापक होत गेले. धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता, सावकारशाहीविरुध्दचा लढा, शेतकरी-कामगार संघटना, सत्यशोधकीय विवाह, धार्मिक स्वावलंबन, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, सत्योधकीय साहित्य, नियतकालिके, प्रचारक, परिषदा, सभा, सत्यशोधक जलसे अशा अनेक माध्यमांतून सत्यशाोधक समाजाला व्यापक लोकआंदोलनाचे रूप प्राप्त झाले. सत्यशोधक समाजाचा महाराष्ट्रभर प्रसार झाला तसेच दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर चळवळीवरही मोठा प्रभाव पडलेला होता. सत्यशोधक समाजाने तत्त्वशुद्ध भूमिका घेऊन कनिष्ठ स्तरातले लोक दीर्घकाळच्या अज्ञानातून जागे केले, पुरोहितशाहीच्या जोखडातून बहुजन समाज मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यातून धार्मिक व सामाजिक परिवर्तनाची पहाट झाली. अठरापगड जातीमधून लेखक, संपादक, शास्त्री, पंडित, शिक्षणतज्ज्ञ, संघटक, नेते, प्रचारक, कार्यकर्ते, कीर्तनकार, जलसाकार वगैरे कर्तृत्ववान व्यक्तींची पिढी निर्माण केली. बहुजन समाजाच्या उत्थानाचे पर्व सुरू झाले. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक समाजाचे खूप मोठे योगदान आहे.

आज पुन्हा धार्मिक पुनरुज्जीवनवादी शक्ती सर्व बाजूंनी उठाव करीत आहेत. देवाधर्माच्या नावाखाली वर्णव्यवस्थेचे गोडवे गायले जात आहेत. बुवाबाजीचे प्रचंड स्तोम वाढत आहे. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी प्रचंड गर्दी होत आहे. धार्मिक व जातीय भावना हा कळीचा मुद्दा बनला आहे. धार्मिक, सामाजिक, मानसिक व आर्थिक गुलामगिरीची दाट छाया पडत चालली आहे. बुद्धिवाद, चिकित्सा, विचार, विवेक या समाजाच्या वैचारिक वृद्धीसाठी आवश्यक बाबींचा अभाव आढळत आहे. या अस्वस्थ करणाऱ्या वास्तवातून वाट काढण्यासाठी सत्यशोधक चळवळीचे विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक आहेत. सत्यशोधकांचाच वारसा अंधश्रद्धा निर्मूलन समिती चालवीत आहे. तो अधिक बळकट करण्याचा आपण निर्धार करू या. सत्यशोधक समाजाच्या वैचारिक दृष्टिकोनांच्या आधारे आपण समाजाची पुन्हा नव्याने बांधणी करू या. सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

**– प्रा. डॉ. अरूण शिंदे**

अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# भारत आपली कूस बदलतोय

**किशोर बेडकिहाळ,** सातारा
९४२३०१२८७७

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सर्व कार्यकर्ते, मित्रांनो आणि मैत्रिणींनो, या विचारमंचावर येण्याची ही माझी पहिलीच वेळ. अंधश्रद्धा निर्मूलन समिती या चळवळीशी आणि पूर्वी एकसंध असणाऱ्या संघटनेशी मी आणि आंबेडकर अकादमीच्या माध्यमातून माझे सहकारी यांचा संबध आणि सहकार्य राहिलेले आहे. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये तुम्हाला काही एक निर्णय करावा लागला. निर्णय घेणे हे त्या-त्या वेळेला आवश्यकदेखील असतं. अशा प्रकारची वेळ सार्वजनिक जीवनामध्ये माझ्यावर आणि माझ्या सहकाऱ्यांच्यावर आलेली होती. त्यावेळेला काही निर्णय घेऊन आम्हाला बाजूला व्हावं लागलं होतं. तत्कालीन परिस्थितीचा आग्रह व गरज म्हणून आपण हे ध्यानात घेतलं पाहिजे. पण म्हणून त्याच्या परिणामापोटी कोणतीही द्वेषभावना, वैरभावना अथवा संघर्षाची भावना मनामध्ये न ठेवता सार्वजनिक जीवनामध्ये जिथे जिथे सहकार्य करता येईल तिथे सहकार्याची भूमिका घेऊन आपण आपआपल्या संघटनाच्या वाटचालीला प्राधान्य देऊया.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथे दि. २ जून ते ४ जून २०२३ रोजी झाली. यावेळी ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केलेले भाषण...**

मी जवळपास १९७२ साली या सामाजिक चळवळीमध्ये दाखल झालो होतो. याचं सर्व श्रेय डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना जातं. त्यांचं बोट धरून मी या चळवळीमध्ये सामील झालो. त्यावेळेला मी १९७२ साली एस.वाय.बी.एस्सी.चा विद्यार्थी होतो आणि १९७३ साली मी नोकरीलादेखील लागलेलो होतो. मी ज्यावेळेला सार्वजनिक जीवनामध्ये आलो त्यावेळेला डॉ. दाभोलकर 'समाजवादी युवक दल' या युवक संघटनेचे नेतृत्व करत होते. सत्तरीच्या दशकामध्ये महाराष्ट्रामध्ये ज्या महत्त्वाच्या राजकीयदृष्ट्या काम करणाऱ्या पण राजकीय पक्षाशी संलग्न नसणाऱ्या अशा ज्या संसद बाह्य राजकीय संघटना निर्माण झाल्या, त्यामध्ये कुमार सप्तर्षींची 'युवक क्रांती दल' ही महत्त्वाची संघटना होती. सुधीर बेडेकर आणि कुमार शिराळकर यांची 'मागोवा' नावाची संघटना होती. लातूर, मराठवाड्याच्या आणि आंबेजोगाईच्या परिसरामध्ये 'दलित युवक आघाडी'ची संघटना होती. पुण्यामध्ये 'फुले समता प्रतिष्ठान' होतं. कोल्हापूरमध्ये दलित-सवर्णांसाठी एकत्रित काम करणाऱ्या संघटना होत्या. महाराष्ट्रभर अशा संघटनांचे पेव त्या काळामध्ये फुटलेलं होतं. युक्रांदसारखीच आमची संघटना होती, राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर भूमिका असणाऱ्या. परंतु कुमार सप्तर्षींनी सांगितलं की, तुम्ही सगळीकडे युक्रांदचाच झेंडा फडकवला पाहिजे, असं काही नाही. म्हणून डॉ. दाभोलकरांनी सातारमध्ये'समाजवादी युवक दल' निर्माण केले. मी, 'उपरा'कार लक्ष्मण माने, पार्थ पोळके, दिनकर झांब्रे, महाराष्ट्रातील ख्यातनाम कवी प्रमोद कोपर्डे, नामांतरासाठी हुतात्मा झालेला विलास ढाणे, आज जरी निरनिराळ्या संघटनांमध्ये दिसत असलो, तरी आम्ही सगळेजण त्याच एका संघटनेचे कार्यकर्ते होतो. १९७१ सालापासून १९८३ सालापर्यंत-म्हणजे आमची संघटना 'समता आंदोलन' नावाच्या संघटनेमध्ये विसर्जित होईपर्यंत-आम्ही सगळे एका संघटनेमध्ये जवळपास तेरा वर्षे काम केलेले आहे. ते जे काही काम केलेलं होतं ते सगळं मूलभूत काम होतं. यात जाणीवजागृती, सामाजिक समतेचे लढे, मजूर संघटना, विद्यार्थी संघटना,. ग्रामीण भागातील कामगारांचे संघटन, रोजगार हमीच्या कामगारांचे संघटन, शहरांमधल्या हमालांचे संघटन,

शेतमजुरांचं संघटन, एक गाव एक पाणवठ्याचा प्रश्न, दलितांचे प्रश्न, त्याबद्दलच्या परिषदा, नामांतरचा प्रश्न अशा विविध स्वरूपामध्ये जवळपास तेरा वर्षे आम्ही सगळ्यांनी एकत्र काम केलं. मला सांगताना अतिशय दुःख होतं की, डॉ. दाभोलकरांची ओळख महाराष्ट्रामध्ये फक्त अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संदर्भात केली जाते, ती त्यांच्यावर अन्याय करणारी आहे. १९७१ सालापासून १९८३ सालापर्यंत आम्ही एकाच संघटनेच्या कामामध्ये होतो. त्यानंतर १९८६ सालापर्यंत आम्ही सगळेजण 'समता आंदोलन' या संघटनेत सामील झालो. त्यानंतर डॉ. दाभोलकरांनी हळूहळू अंनिसच्या दिशेने वाटचाल सुरू केली आणि अंनिसची स्थापना १९८९ मध्ये झाली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा बायोडेटा जो प्रसिद्ध करण्यात आलेला होता, त्याच्यातही या तेरा-चौदा वर्षांचा हिशोब लिहिला गेला नव्हता.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आधीचे संस्थापक असणारे श्याम मानव साताऱ्यामध्ये आले होते. अंधश्रद्धा निर्मूलन समिती सुरू करण्यासंबंधीची बैठक माझ्या घरामध्येच श्याम मानवांच्या उपस्थितीमध्ये झालेली होती. पुढे काही कारणाने मतभेद झाले. माणसे दूर गेली. वैचारिक मतभेद झाले. पण १९८९ ला डॉ. दाभोलकरांनी अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली आणि ती आजतागायत यशस्वीपणे वाटचाल करत आहे. अंनिसचे कार्य त्यांचे जीवितकार्य ठरलं. अंनिसचे अगोदरचे दाभोलकर आपल्याला अनेक अंगाने राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते म्हणून माहीत असण्याची शक्यता नाही. पण आता सहज त्यांची आठवण आली आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती म्हटलं की, डॉ. दाभोलकर, दाभोलकर म्हटलं की, अंधश्रद्धा निर्मूलन समिती हेच समीकरण प्रचलित आहे.

तेरा-चौदा वर्षाच्या पुष्कळ प्रकारच्या आठवणी दाभोलकरांच्या व्यक्तित्वाला उजाळा देणाऱ्या आहेत. काही वेळा आमचे मतभेदही झाले, ते संघटनेमध्ये ढळढळीतपणे मांडले गेले. वेगळे होण्याची वेळ आली तेव्हा शांतपणे आम्ही वेगळे झालो. पण आमच्या कोणाच्याही मनामध्ये कटुता राहिली नाही. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये गरजेनुसार आम्ही पुनः पुन्हा एकत्र येत राहिलो आणि परिवर्तनवादी चळवळींना बळ देत राहिलो. सांगायचा मुद्दा असा आहे की, संघटना निर्माण होतात, फुटतात, मतभेद होतात, माणसं आपापले मार्ग शोधतात, ही माणसाच्या आयुष्यामध्ये घडणारी प्रक्रिया आहे असं मी मानतो. त्याची चर्चा करत बसू नये. वेगळे झालो म्हणून आपण वेगळ्या उद्दिष्टाप्रति नाही, आपण आपल्या मनामध्ये किंतु ठेवू नये. जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे परिवर्तनाच्या लढाईला बळ देण्यासाठी नि:संकोचपणे आपआपले अस्तित्व वेगळे राखून का होईना; पण एकत्र यायला आपण शिकलं पाहिजे आणि यायलाच पाहिजे. संघटना वेगळी होणं म्हणजे शत्रुभाव निर्माण होणं नाही, हे आपण आपल्या मनामध्ये पक्कं लक्षात ठेवावं ही माझी आपणाला विनंती आहे. पुष्कळ गोष्टी दाभोलकरांच्याबद्दल मला माहिती आहेत किंवा अंनिस संघटनेबद्दल माहिती आहेत. त्यांच्याबरोबर मी पुष्कळदा बोललोदेखील आहे. मी जे विनासंकोच सहकार्याचे आवाहन पुन्हा एकदा करतोय त्याला एक पार्श्वभूमी आहे आणि ती आजच्या परिस्थितीची पार्श्वभूमी आहे, याच भान ठेवलं पाहिजे.

गेल्या नऊ-दहा वर्षांपासून भारत आपली कूस बदलतोय. भारताचे एक स्थित्यंतर आपण अनुभवतोय. स्वातंत्र्य चळवळीमध्ये निर्माण झालेली मूल्ये, त्याच्यावर आधारलेली भारताची संकल्पना (Idea of India) त्याच्यातून निर्माण झालेली राज्यघटना, त्याच्यामध्ये ही सगळी मूल्ये गठित झालेली आहेत. त्या राज्यघटनेच्या आधारे सुरू केलेल्या वाटचालीला आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. पण या सगळ्या संचिताबद्दल आज समाजातल्या अनेकांकडून प्रश्न निर्माण केले जात आहेत. केवळ सत्तेकडून प्रश्न निर्माण होत आहेत असं नव्हे तर अनेकांकडून होत आहे. अशा एका स्थित्यंतराच्या अवस्थेमध्ये आज आपण आहोत. या स्थित्यंतरांमधून काय काय घडणार आहे याचा आपल्याला अंदाज येऊ शकतो. अर्थात, जागरूक राहिलो तर. या स्थित्यंतरामध्ये सर्वात प्रतिकूल वातावरण आपल्या कार्यासाठी निर्माण होण्याची जास्त शक्यता आहे.

आजच आपण वर्तमानपत्रामध्ये वाचलं असेल की, दहावीच्या अभ्यासक्रमामधील एनसीईआरटीमधून लोकशाहीची संकल्पना काढण्यात आलेली आहे. आवर्तसारणी ही संकल्पना हद्दपार करण्यात आलेली

आहे. डार्विन हद्दपार झालेला आहे. इतिहासामध्ये हिंदूंच्या पराभवाच्या नोंदी असणारा अभ्यासक्रम शिकवायचा नाही. तशा प्रकारचे फतवे शिक्षणक्षेत्रामध्ये येऊ घातलेले आहेत. इतिहासामधून मोगल हद्दपार झालेले आहेत. लाल किल्ल्यासंदर्भात जी डॉक्युमेंटरी दाखवली जाते, त्या डॉक्युमेंटरीमध्ये इंग्रजांचे राज्य सुभाषचंद्र बोस, क्रांतिकारक आणि १८५७ चा उठाव एवढ्याच गोष्टींचा समावेश स्वातंत्र्यलढ्यात होतो, हे दर्शकांना सांगितलं जातं. नेहरू गेले, गांधी गेले, आंबेडकर गेले, चळवळी गेल्या, गांधीविचार तर अगोदरपासूनच हद्दपार करण्याचे प्रयत्न चालू झालेले आहेत. काही ठिकाणी आंबेडकर, नेहरूही बाजूला गेलेले आहेत. कोणत्या प्रकारचे शिक्षणक्षेत्र आपल्यासमोर असणार आहे याचा अंदाज यायला लागलेला आहे. हेच विद्यार्थी ज्यावेळी परदेशी शिक्षणासाठी जातील त्यावेळेला त्यांचं काय होईल हा विचारही आपल्या कोणाच्या मनात येत नाही. विज्ञान आणि विज्ञानावर आधारलेला सगळा विचार, वैज्ञानिक विचारपद्धती, तर्कपद्धती, विश्लेषणपद्धती, अंदाज घेण्याची पद्धती या सगळ्यांना शिक्षणक्षेत्रामध्ये आज अजिबात महत्त्व नाही. या अभ्यासक्रमातून तयार होणारे विद्यार्थी जे काही शिकतील ते कशाला सत्य मानणार आहेत, त्या सत्याची चिकित्सा करणार आहेत की नाही, त्यात चिकित्सेला वाव आहे की नाही हाच एक मोठा प्रश्न शिक्षणक्षेत्रामध्ये, शिक्षणतज्ज्ञांपुढे उपस्थित झालेला आहे.

दुसऱ्या बाजूला शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये भारतीय ज्ञानव्यवस्था म्हणून एका नव्या गोष्टीचा शिरकाव झालेला आहे. सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमामध्ये या ज्ञानव्यवस्थेला किमान स्थान दिलेच पाहिजे, ही सूचना युजीसीकडून दिली जात आहे. त्या ज्ञानव्यवस्थेमध्ये काहीही असू शकतं. उदा. पुणे विद्यापीठांमध्ये अथर्वशीर्ष पठणाचे कोर्सेस सुरू केलेले आहेत. ज्योतिषाचे कोर्सेस सुरू झाले आहेत, तेव्हा मला आश्चर्य वाटलं नाही. घरामध्ये दैनंदिन धार्मिक प्रार्थना म्हटल्या जातात, त्याही जर अभ्यासक्रमाचा भाग झाल्या तर त्याचं काय करायचं हाही प्रश्न उपस्थित होतो. भारतीय ज्ञानव्यवस्थेला विरोध नाही. कोणती ज्ञानव्यवस्था? आर्यभट्ट, वराहमिहीर, भारताच्या परंपरेत होऊन गेलेले वैज्ञानिक, त्यांचे विचार जरूर शिकवावेत. त्याची चिकित्सा व्हावी. चिकित्सा ही आधुनिकतेचा आरंभच आहे. कोणताही समाज कोणत्याही कालखंडामध्ये जेव्हा जगत असतो तेव्हा त्याला आपले जीवन यशस्वी करताना आणि पुढे नेताना जे जे प्रश्न निर्माण होतात त्याच्यावर त्याला तोडगा काढावा लागतो. उपाय शोधावे लागतात. हे उपाय पृथ्वीवरच्या सर्व मानव समुदायांनी त्यांच्या त्यांच्या काळामध्ये शोधले आणि ते त्या पद्धतीने जगले. नवीन ज्ञान आणि विज्ञान विशेषतः जसजसे पुढे येत गेलं तसतसे जुन्या ज्ञानाच्या काही मर्यादा जाणवायला लागल्या. त्या मर्यादा दाखवल्यानंतर नवीन ज्ञान घेऊन पुढे जायचं का जुन्या ज्ञानव्यवस्थेला चिकटून बसायचं हा प्रश्न भारतातही इंग्रजी राजवटीच्या काळात उपस्थित झालेला होता. त्यावेळेला अर्थातच आधुनिकतेची बाजू घेण्यात आली. आधुनिक अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, इतिहासशास्त्र या सगळ्या क्षेत्रातल्या आधुनिकतेची सरशी तेव्हापासून आत्तापर्यंत दिवसेंदिवस वाढत आहे. आता मात्र ही सरशी राहाणार नाही. प्रत्येक क्षेत्रामध्ये पर्यायी म्हणून पारंपरिकता आणून त्याच्यावर अभ्यासक्रमांमध्ये भर देऊन त्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे मन तयार केलं जाणार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षांमध्ये ज्या प्रकारचा विद्यार्थी आणि नागरिक आपल्याला निर्माण करायचा होता, तो घटनेच्या आणि स्वातंत्र्य चळवळीने निर्माण केलेल्या मूल्यांवर आधारित असावा हे आपल्याला अपेक्षित होतं. आता नव्या अभ्यासक्रमातून येणारा नागरिक हा विज्ञानाला आणि खऱ्या इतिहासाच्या लेखनाला मर्यादा घातलेल्या वातावरणातील असणार आहे. खरा इतिहास आता शिकवला जाईलच असे नाही. मग असा नागरिक कोणत्या राष्ट्राचं सूचन करतो? हे जे नव्या राष्ट्राचे सूचन आहे त्याला डॉ. सुहास पळशीकर यांनी 'बर्थ ऑफ न्यू रिपब्लिक' असं म्हटलेलं आहे. हे न्यू रिपब्लिक कोणाचं असणार आहे? ते धर्माचं असणार आहे का? का एका विशिष्ट धर्माचं असणार आहे? हे सगळे प्रश्न आज उपस्थित होत आहेत. आपल्या आजूबाजूला ज्या घटना घडतात त्या घटना आपल्या या शंकेची पुष्टी करणाऱ्या आहेत. त्यात आता संदिग्धता राहिलेली नाही. जे आहे ते निःसंदिग्धपणे पुढे येत आहे.

म्हणून मग हिंदू राष्ट्र काय असेल, काय नसेल याच्या चर्चा सुरू झालेल्या आहेत.

अभिनेते शरद पोंक्षे एका सभेत असं म्हणाले की, भारत हा हिंदू धर्मीयांचा देश आहे आणि अन्य धर्मीयांना इथे दुय्यम स्थान स्वीकारावं लागेल. हे इतक्या उघडपणे पूर्वीही बोललं जात होतं. बोललं जात नव्हतं असं नाही. पण पूर्वी बोललं जाणाऱ्यांच्या मागे असणार बळ आणि आत्ता बोलत असणाऱ्यांच्या मागे असणार बळ याच्यामध्ये बदल आहे. आज जे बळ आहे ते बळ हे उच्चारवाने सांगते. पूर्वीचे जे होतं ते बळ नसल्यामुळे हळूहळू कुजबुजीच्या स्वरूपामध्ये चालू होतं. ते आज मोठ्या आवाजामध्ये रूपांतरित होताना दिसत आहे. आपल्या सगळ्या कामाचं आव्हान किंवा जे काम आपल्याला करायचं आहे त्याच्याभोवती कोणती परिस्थिती असेल त्याचा हा एक संदर्भ आहे.

दुसरा महत्त्वाचा संदर्भ असा आहे की, आपण जे शिकलो की लोकशाही हे बहुमताचं राज्य आहे. ते बहुमत हे राजकीय बहुमत आहे, असं आपण वर्गामध्ये, पुस्तकांमध्ये, टेक्स्टमध्ये, भाषणांमध्ये, निरनिराळ्या विचारवंतांच्या लेखनामध्ये शिकलो. ते बहुमत हे राजकीय बहुमत असतं. जातीय किंवा धार्मिक बहुमत नसतं. आंबेडकरांनी संविधान सभेमध्ये बोलत असताना ज्या धोक्याबद्दलचं अतिशय परखड विश्लेषण केलेलं होतं आणि ते असं म्हणाले की, 'भारतात लोकशाही यशस्वी व्हायची असेल, विशेषतः राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक, आर्थिक लोकशाहीचा पाया निर्माण झाल्याशिवाय ते होणार नाही. सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण न होता राजकीय लोकशाही निर्माण झाली, तर या देशांमधलं बहुमत हे राजकीय न राहाता जातीय राहील, असं त्यांनी त्यावेळेला निःसंदिग्धपणे सांगितलेलं होतं. म्हणजेच त्यांना जे सुचवायचं होतं त्या खऱ्याखुऱ्या समतेचा प्रत्यय सर्वसामान्यांना आल्याखेरीज ते मोकळेपणाने राजकीय बहुमताच्या प्रवाहात सामील होऊ शकत नाहीत, कारण त्यांच्या मताला किंमत नाही. त्यांच्या सामाजिक स्थानामुळेही कारण त्यांच्यामागे पाठबळ नाही. आंबेडकरांनी तेव्हाही सांगितलं होतं की, आपण लोकशाही स्वीकारतोय. लोकशाहीमध्ये आपण 'वन मॅन वन व्होट' ही भूमिका स्वीकारतोय. पण प्रत्यक्षामध्ये 'वन मॅन वन व्होट' या कल्पनेला अर्थ केव्हा येईल ज्यावेळेला 'वन मॅन वन व्हॅल्यू' असे असेल त्यावेळेला होईल. रतन टाटा, अंबानी, अदानी साहेब यांच्या म्हणण्याला जे वजन आहे तेच वजन सामान्य माणसाच्या मताला असेल तर 'वन मॅन वन व्होट अँड वन व्हॅल्यू' हे एका रेषेमध्ये येतात. हे नसेल तर 'वन मॅन वन व्होट' असेल पण 'वन मॅन वन व्हॅल्यू' असणार नाही. समाजाच्या मताआधारे प्रतिनिधी निवडून जातील; पण त्यांच्या नावे राज्य चालणार नाही. ज्यांच्या मताला किंमत आहे अशांच्या मतांच्याआधारे राज्य चालेल. ही परिस्थिती आपण अनुभवतोय. म्हणून कम्युनल मेजॉरिटी भारतामध्ये असणं हे धोकादायक आहे. कारण या संकल्पना वापरणाऱ्या देशांची फारशी प्रगती झालेली नाही, हे वास्तव आहे. उरलेले शीख, मुस्लीम, जैन, आदिवासी आदी अल्पसंख्यांक आहेत त्यांच्यापुढेही प्रश्न उपस्थित होणार आहेत. स्वातंत्र्य चळवळीने जो विचार आपल्याला दिलेला होता त्याच्यामध्ये या सगळ्यांचा विचार करून त्या पद्धतीच्या तरतुदी आपण केलेल्या आहेत. कलम ३० अन्वये अल्पसंख्यांकांच्या संस्कृतीला आणि शिक्षणव्यवस्थेला आता संरक्षण मिळेलच असे नाही. सगळे सारखे ढोबळ भूमिका आशयशून्य भूमिका आहे. कम्युनल मेजॉरिटीलाच राजकीय बहुमत म्हणायचं अशा प्रकारचं राजकीय चर्चाविश्व आज भारतामध्ये आहे. भारतात बहुसंख्य हिंदूच आहेत. असं असलं तरी बहुमत हे बहुसंख्येवर ठरते. धर्म आणि जातीवर आधारित होत नाही. एका विशिष्ट बहुसंख्य असणाऱ्या विशिष्ट धर्माच्या बहुसंख्येने निर्णय होत नाही. हा निर्णय संसद किंवा राष्ट्राचा निर्णय म्हणून त्याच्यामध्ये सगळ्यांचा विचार केला गेला असेल असं नाही. तो विचार करताना इतरांची मतं विचारात घेतली असतील असेही नाही. म्हणून आंबेडकरांचा इशारा खरा ठरण्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या अवतीभोवतीच्या परिस्थितीशी निगडित हा दुसरा संदर्भ आहे.

याच्यातून निर्माण होणारा तिसरा संदर्भ असा आहे की, एका मेजॉरेटेरीअन लोकशाहीकडे आपण वाटचाल करत आहोत. वांशिक अंगानं जाणाऱ्या समुदायांचे बहुमत म्हणून इथे मेजॉरिटी असणारी जी लोकसंख्या

आहे, त्यांना काय वाटतं, त्यांचे प्रश्न काय आहेत, त्यालाच या देशाच्या सार्वजनिक धोरणाच्या प्रक्रियेमध्ये प्राधान्य मिळेल, असा त्या मेजॉरेटेरीअन भूमिकेचा एवढाच अर्थ एका मर्यादेत डिफेंड करता आला असता. दुसरा अर्थ जो आहे ते मेजॉरेटरीअनचा अर्थ घेणार नाहीत. मेजॉरिटीने घेतलेला निर्णय मी जर मान्य करणार नाही, तर मी लोकशाही मानत नाहीत असा त्याचा अर्थ होतो. आज सबंध राजकीय व्यवस्थेची वाटचाल बहुमतवादाच्या दिशेने चालू आहे, हा परिस्थितीचा धोका आहे. प्रत्यक्षामध्ये समाजजीवनाची विभागणी आणि ही मेजॉरिटी पुन्हा धर्मिक अंगाने बहुसंख्य पाहाणारी झाली आहे. अगदी छोट्या छोट्या गावांमध्ये हिंदूंचे राष्ट्र, मायनॉरिटींना कसं लोटांगण घालायला लागेल हे आता दिसतेय. हाउसिंग सोसायटी असतील, जागा भाड्याने देण्याचे प्रश्न असेल, घरं वाटायचे प्रश्न असतील, मंगल कार्यालय मिळण्याचे प्रश्न असतील, त्या सगळ्याच ठिकाणी आज अल्पसंख्याकांना अडचणी उत्पन्न होताना दिसत आहेत. याचं कारण बहुसंख्याकवाद. भाजप आज सर्वात मोठा जो पक्ष समजला जातो, याचं राज्य आहे. त्या पक्षाच्या संसदीय प्रतिनिधित्वामध्ये एकही मुस्लीम माणूस नाही. एकही प्रतिनिधी नाही. स्त्रियांचे प्रमाण तर घटत चाललेलं आहे. कमी प्रमाण समजू शकतो; पण तिकीट दिले नाही तर प्रमाणाचाही प्रश्न नाही. ज्यावेळेला सबंध १४० कोटी लोक असा उल्लेख आपण करतो, तेव्हा त्या १४० कोटी लोकांमधल्या जवळपास २० टक्के लोकांना संसदेत प्रतिनिधित्व नसणं म्हणजेच संसदेचे सगळे निर्णय त्यांच्या प्रतिनिधित्वाविना, त्यांच्या सहमतीविना घेणे असा त्याचा अर्थ होतो. हा लोकशाहीचा मूळ अर्थ नाही.

आपण असे मानत होतो की, संसदेमध्ये निवडून येणारा प्रत्येक खासदार किंवा विधानसभेमध्ये निवडून येणारा प्रत्येक आमदार हा एका विशिष्ट मतदारसंघातून निवडून येत असेल; परंतु तो सगळ्या देशाचे / राज्याचे प्रतिनिधित्व करतो. सगळ्या देशाचं प्रतिनिधित्व तसेच देशातल्या सगळ्या विविधतेचा प्रतिनिधित्व आणि प्रतिबिंब संसदेमध्ये पडायला पाहिजे. ते या संसदेत दिसत नाही. पूर्वी ते फार मोठ्या प्रमाणात होतं अशातलाही भाग नाही. पण प्रतिनिधित्व दिलं जायचं. कारण जवळपास १९७५–१९७६ नंतर 'इलेक्ट्रोरल मेरिट' नावाची नवीन संकल्पना पक्षीय राजकारणामध्ये रूढ झालेली आहे. तिकिट कोणाला द्यायचं, तर जो निवडून येतो त्याला द्यायचं. हे स्वच्छ मत सर्वच पक्षात आहे. पैशाच्या आधारावर, पैसा खर्च करण्याच्या क्षमतेच्या आधारावर कोण निवडून येऊ शकतो, ही 'इलेक्ट्रोरल मेरिट'ची संकल्पना आहे. एकवेळेस ही कल्पना जरी वादासाठी मान्य केली तरीसुद्धा अशी क्षमता असणारे अल्पसंख्यांकामधील लोकही आहेत. तरीही त्यांचे प्रतिनिधित्व नाही. म्हणजेच एका मोठ्या समुदायाचं प्रतिनिधित्व आम्ही करणारही नाही आणि देणारही नाही. त्यांच्या मतांची आम्हाला गरज नाही. कारण एका विशिष्ट धर्माच्या आयडेंटिटीवर ४०–५०% मतं जरी मिळाली, तरी आमचं सरकार निर्विवादपणे निवडून येऊ शकतं. असं राजकारण्यांना वाटतं म्हणजे हळूहळू यापुढे सत्ता निर्माण होण्यामध्ये, सत्तानिर्मितीमध्ये आपला सहभाग नाही. धोरण ठरवण्यामध्ये आपला सहभाग नाही. आपल्याला प्रतिनिधित्व नाही. त्यामुळे आपल्या सगळ्या समस्या कोणाच्यातरी मेहरबानीवर, कृपेवर अवलंबून आहेत. जे हक्काच्या रूपाने दिले आहे ते कोणाच्यातरी मर्जीवर, अवलंबून असेल, अशा एका पातळीवर एक समुदाय आहे.

हे संदर्भ का सांगतो आज तुम्हाला? तुम्ही सगळेजण एका विशिष्ट मुद्द्यांवर काम करणारी संघटना म्हणून उभे आहात. महाराष्ट्रात बऱ्याच संघटना नव्वदच्या दशकामध्ये निर्माण झाल्या. एक गाव एक पाणवठा, समान पाणी वाटप, दलितांच्या जमिनीच्या अतिक्रमणावर काम करणाऱ्या संघटना, अंधश्रद्धांवर काम करणारे संघटन या अर्थाने तुम्ही प्रश्नांवर आधारित संघटना चालवत आहात. अंधश्रद्धेचा तो प्रश्न मोठा आणि व्यापक आहे आणि व्यापक भूमिकाही तुम्ही घेता. कायदा करण्यापर्यंतच्या तुमच्या भूमिका व्यापक आहेत. एका क्षेत्रापुरते काम करत असताना ते काम आपल्याला निर्विवादपणे, तेवढ्याच उत्साहाने आणि ताकदीने चालू केव्हा ठेवता येईल, जेव्हा आजूबाजूच्या परिस्थितीचे संदर्भ अशा प्रकारचे काम करण्यासाठी पूरक असतील तेव्हा. तसे नसतील तर प्रत्येक वेळेला तुमच्या कामावर एकप्रकारे प्रश्नचिन्ह निर्माण होईल. तुम्ही फक्त हिंदूंच्या धर्माची चिकित्सा करता, फक्त हिंदूंची देवळं तुम्हाला

दिसतात इतर धर्माची दिसत नाहीत. हे चुकीचं आहे, हे खोटं आहे, तुम्हालाही माहिती आहे; पण प्रचाराचा जोर आणि ताकद एवढी जबरदस्त आहे की जे खरं आहे तेसुद्धा लोकांना सांगून पटत नाही. अशा अवस्थेत आपण आहोत या प्रचाराकडे दुर्लक्षितही करता आलं असतं, जर त्यांची संख्या थोडी असती, त्यांना फॉलोईंग नसतं तर आज सरळ सरळ असं सांगितलं जातं की, एकावेळेला एक खोटी घटना वीस लाख लोकांपर्यंत पोहोचवण्याची आमची क्षमता आहे. त्यांचे प्रत्येकी पाच नातेवाईक धरले तरी एक कोटी लोकांपर्यंत पोहोचते. सोशल मीडियाच्या माध्यमातून किती खोटे पसरवता येते याचा हा नमुना.

उदा. उत्तरप्रदेशचे माजी मुख्यमंत्री मुलायमसिंग यादव यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्युनंतर भारत सरकारने त्यांना २६ जानेवारी २०२२ ला 'पद्मविभूषण' पदवी दिली. ते आणि त्याचा मुलगा अखिलेश यादव एकाच पक्षात असले तरी त्यांच्यात मतभेद होते. राजकीय स्पर्धा ही घराण्यामध्ये असतेच. इतिहास काळापासून आपण ते पाहातोय. एक बातमी फक्त सोशल मीडियावर अशी सोडली गेलेली अखिलेश यादव यांनी आपले वडील मुलायमसिंग यादव यांना थोबाडीत मारली. क्षणार्धात ती व्हायरल झाली. असं कसं घडलं म्हणत संबंध उत्तरप्रदेश हादरला. उत्तरप्रदेशमध्ये अखिलेश यादवांचे २०१४-१९ या काळामध्ये संपूर्ण बहुमतावर आधारलेले राजकारण होतं. २०१९ ला ते सरकार पडलं. नवीन सरकार आलं. भाजपच! त्यामुळे या बातमीला महत्त्व आलं आणि मुलायमसिंगांचा एवढा मोठा अपमान. अखिलेश यादवच्या पक्षाबद्दल उत्तरप्रदेश मधल्या लोकांच्या मनामध्ये असंतोष निर्माण व्हावा. बापाला थोबाडीत मारायला कमी केलं नाही. ही जी तुलना आहे, बापाला मारणं ही कोणत्या इतिहासाशी निगडित आहे हे आपणाला माहिती आहे. औरंगजेबाने कुणाला कैद केलं होतं, शहाजहानचे कसे हाल झाले होते, दारा शिकोव कसा मेला, हे आपल्याला माहीत आहे. अशा घटना त्याच्याशी कळत-नकळत जोडल्या जातात. म्हणजे दिसायला थोडं दिसतं; परंतु ते दीर्घकालीन मानसिकतेवर परिणाम करणार असते. याच्यातून जे मानस निर्माण होणार आहे ते सगळ्या काही हिंसा करणारे मानस नाही, तर ते अशा कुठल्याही घटनांवर विश्वास ठेवणारं मानस असेल. जे लोकशाहीला हानिकारक आहे म्हणून, त्याचा प्रतिकार कसा करायचा हा इतरांच्यासारखा तुमच्यासमोर उभा असणारा प्रश्न आहे. जो जगभर दिसतो आहे.

आज जगभर स्ट्राँग लीडरशिप या संकल्पनेचा आग्रही आहे. आपला नेता कणखर असला पाहिजे आणि तो आपल्याला विश्वास देऊ शकला पाहिजे की, काळजी करू नका. मी तुम्हाला ग्वाही देतो. आज जगभर सुप्त आक्रमक राष्ट्रवादाची लाट दिसते. इस्रायलमध्ये काय चाललंय हे आपणाला माहिती असेलच. सर्वोच्च न्यायालयाने सरकारविरोधी निर्णय देता कामा नये, म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार कमी करण्यात आले. त्यांच्या दुर्दैवाने इस्रायलमधली सर्वसामान्य जनता मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर आली. पण तोच इस्रायली माणूस पॅलेस्टाईनच्या प्रश्नावर रस्त्यावर येणार नाही ही देखील एक बाजू आहे. आपल्या हिताचं रक्षण करणारा स्ट्राँग लीडर आणि त्याच्याभोवती गुंफलेलं नेशन अशी एक बांधणी आता आपणाला जगभर दिसते. एका टप्प्यावर असा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता असते की, तुम्हाला जर देश वाचवायचा असेल, देशाकडे कोणी वाकड्या नजरेने बघायचं नसेल आणि देशांतर्गत शत्रूंचा कडेकोट बंदोबस्त करायचा असेल तर कायदा आणि सुव्यवस्था यासाठी प्रसंगी लोकशाही बाजूला ठेवून कणखर राज्य करणारा प्रशासक नेता आपल्याला हवा. असा नेता हवा असेल तर काही काळ लोकशाहीचे व्यवहार बाजूला ठेवले गेले तरी चालतील, याला आज मान्यता मिळताना दिसते.

आशुतोष वार्ष्णे म्हणून अमेरिकेमध्ये भारताच्या अभ्यासाचे प्राध्यापक तिथे स्थायिक झालेले आहेत. त्यांनी आता अलीकडे एक नवा सिद्धांत मांडलेला आहे. ते असे म्हणाले की, आता भारतामध्ये जी लोकशाही आहे त्यामध्ये निवडणुकांची लोकशाही महत्त्वाची ठरते आहे. संविधानिक पद्धतीने संविधानाच्या आधारावर राज्य केलेला राज्यकारभार. संविधानानुसार चालणारा समाज, ही जी बेसिक कॉन्स्टिट्यूशनल डेमोक्रसी ही आता बाजूला पडत आहे. निवडणुका होतील पण कॉन्स्टिट्यूशन प्रॅक्टिस फॉलो केली जाईल की नाही हे माहीत नाही. उदा. दिल्लीला पूर्णराज्याचा दर्जा दिला

आहे; पण पूर्णराज्याचे अधिकार नाहीत. दिल्लीची एक विशिष्ट स्थिती आहे. ती राजधानी आहे. त्यामुळे केंद्र म्हणजे कॉन्स्टिट्यूशनल फेडरलिझममध्ये असणाऱ्या तरतुदीसुद्धा कठोर काढूनसुद्धा आम्ही बदलू शकतो. आमच्या सोयीसाठी. म्हणून आशुतोष वार्ष्णे असं म्हणतो की, आता कॉन्स्टिट्यूशनल डेमोक्रसी आणि इलेक्ट्रोल डेमोक्रसी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतील ही शक्यता आता संपली. निवडणुका येतात, निवडणुका होतील आणि तेवढाच लोकशाहीचा भाग नियमितपणे या देशांमध्ये पार पाडला जाईल. पण कॉन्स्टिट्यूशनल डेमोक्रसी दिवसेंदिवस कमी कमी होत जाईल असं त्याचा सिद्धांत सांगतो. याला प्रतिवाद का होत नाही? याला प्रतिकार का होऊ शकत नाही? राजकीय पक्ष प्रतिकार करायला कमी का पडतात? आपल्यासारख्या सामाजिक संघटना का कमी पडतात? त्याचे एक उत्तर त्याने दिलेले आहे. तो असं म्हणाला की, भारतासारख्या प्रचंड विविधता असणाऱ्या देशांमध्ये एकच एक प्रश्न सबंध देशाच्या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती प्रश्न होऊ शकत नाही. जातीचा प्रश्न असेल तर जात विशिष्ट प्रदेशामध्ये संघटित झालेली आहे. बंगाली भाषेचा प्रश्न निर्माण झाला तर मराठीचा काही संबंध नसतो. धर्माचे प्रश्न निर्माण झाले तरी धर्माचं सरसकट एकच मॉडेल भारतभर नाही. म्हणजेच असा एकही प्रश्न नाही की, जो एकाच वेळेला सगळ्या भारताचे लक्ष वेधून घेऊ शकेल आणि त्याच्यामागे ताकद एकवटेल. असे प्रसंग इतिहासात विरळच.

याची दोन उदाहरणं आपल्याला देता येतात. १९७४ साली जयप्रकाश नारायण यांनी भ्रष्टाचारविरोधी प्रचंड आंदोलन उभा केलं आणि त्यावेळेला देशभरचा तरुण एकवटून सामाजिक चळवळीमध्ये सगळ्यात मोठ्या संख्येने सामील झाला. आम्हीसुद्धा त्याचे प्रॉडक्ट आहोत. त्याच्यानंतर २०१२ सालामध्ये ३८ वर्षांनंतर अण्णा हजारेंचं आंदोलन झालं. हे देशाचं प्रतीक आहे, असं प्रतीक भासवलं गेलं. प्रत्यक्षात असं नव्हतं. स्पॉन्सर्ड बाय मीडिया अँड आरएसएस. यात अप्पर लाईट मिडल क्लास ऑफ सिव्हिल सोसायटी आघाडीवर होता. त्यामुळे पैशाचा प्रश्न नव्हता. माध्यम ताब्यात होते आणि त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधामध्ये मोठ्या प्रमाणात आंदोलन निर्माण करून, राग निर्माण करून आपण पुढे यायचं असं मानणारे काही राजकीय नेते होते. म्हणून तो भारताचा प्रश्न मी मानत नाही. पण दिसतं असं की, त्या प्रश्नावर माध्यमांमुळे टी.व्ही.वर चर्चा सुरू होत. माणसं ऐकत असत. एवढ्या पातळीवरच पार्टिसिपेशन त्याच्यानंतर आजतागायत असा प्रश्न निर्माण झालेला नाही. आता माझ्यासारख्या जुन्या कार्यकर्त्याला असा प्रश्न पडतो की, लोकशाहीतील धर्मनिरपेक्षतेचे मूल्य प्रत्यक्ष समाजजीवनामध्ये रुजावीत म्हणून या सगळ्या चळवळी झाल्या, कायदे झाले, ते आज का होऊ शकत नाहीत? त्याच्या अंमलबजावणीचा आग्रह का धरला जात नाही? दिल्ली राज्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने त्यांना दिले; पण केंद्र सरकारने ते वटहुकूम काढून पुन्हा आपल्याकडे घेतले. त्याचं कारण दोन-तीन पिढ्या स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या. स्वातंत्र्यानंतरच्या सार्वजनिक क्षेत्रातले आंदोलन असेल, सरकारी नोकऱ्या असतील त्यात निर्माण झालेले प्रश्न असतील, मध्यमवर्ग असेल, त्या मध्यम वर्गाच्या तिसऱ्या पिढीमध्ये आज आपण आहोत. त्या पिढ्यांना विचारांशी बांधिलकी नाही. नुसती बांधिलकी नाही तर हा इतिहास, हे मूल्य हे आमच्या डोक्यावर ओझं आहे  आणि आता आम्हाला हे ओझं टाकून द्यायचं आहे आणि मोकळ्या मनाने जगाला सामोरे जायचे आहे अशी त्यांची भूमिका आहे. म्हणून आज इतिहासाचे वाद इतिहासाची मोडतोड झाली काय आणि नाही झाली काय आम्हाला फरक पडत नाही ही भूमिका असणारा एक प्रचंड मोठा मध्यमवर्ग आज आपल्या देशामध्ये पन्नास कोटीच्या संख्येने आहे. ही संघटित वर्गाची आकडेवारी ६० कोटीपर्यंत गेली आहे. (१४० कोटी मध्ये ६० कोटी) आज आपण ८० कोटींना फुकटचे स्वस्त धान्य देतो. ते दारिद्र्यरेषेखाली येतात, हे आपण कबूल करायला तयार नाही. याच्यासाठी सगळी अर्थव्यवस्था आणि त्यांचं सगळं भागल्यानंतर यांचं काय करायचं म्हणून यांना सामाजिक सुरक्षेच्या योजनेच्या नेटवर्कखाली आणलं जातं. शेतकऱ्यांची रक्कम खात्यात दिली जाते. फुकट स्वस्त धान्य मिळेल यावर ८० कोटींचा वर्ग भुलून चाललेला आहे आणि ८० कोटींच्या लोकांचं राजकारण करणारा एकही सक्षम राजकीय पक्ष आज नाही. आमचे सगळे राजकीय पक्ष वरच्या ६० कोटी

लोकांच्यावर चालतात. राजकारण करतात. म्हणून ८० कोटींना फुकटच्या अन्नावर पोसायची पाळी येते. ते फुकट देऊ पण त्यांची क्रयशक्ती वाढू देणार नाही. असंच आजचं आर्थिक गणित आहे. वर्षानुवर्षे त्यांना आम्ही देऊ पण त्यांचं धान्य बंद करून क्रयशक्ती वाढवू, असा एकही राजकीय पक्ष, (डाव्या पक्षाचा अपवाद) म्हणत नाही. अशा परिस्थितीमध्ये या ६० कोटी मध्यमवर्गामध्ये ज्या प्रकारच्या कल्पनांची पेरणी होईल, त्याच्यावर या देशाचे यश ठरणार आहे.

तुम्ही कदाचित ग्रामशी हे नाव ऐकले नसेल. तुमच्याकडे काही प्राध्यापक असतील, राज्यशास्त्राचे, इंग्रजीचे त्यांना याबद्दल माहिती असेल. तर कार्ल मार्क्सच्या नंतर त्याच्या परंपरेमध्ये निर्माण झालेला ग्रामशी हा एक विचारवंत आणि त्याने एक मूलभूत मांडणी त्या काळामध्ये केली होती. ती आजही लागू आहे. तो असं म्हणाला की, प्रत्येक सत्ताधारी वर्गाला आपल्या विचारांचं वैशिष्टच आणि प्रभुत्व टिकवण्यासाठी एका सांस्कृतिक प्रवाहाची गरज लागते. तो सांस्कृतिक प्रवाह मध्यम आणि खालच्या वर्गामध्ये निर्माण होणं हे सत्ताधाऱ्यांना आवश्यक आहे. तो त्यांच्यात कसा निर्माण होईल, तसाच खालच्या गटांमध्येसुद्धा निर्माण होईल हे सत्ताधारी पाहात असतात. डॉ. आ. ह. साळुंखे आपल्याला नेहमी सांगत असतात, शोषकांचा आणि शोषितांचा धर्म एक नसतो. पण आपल्या देशामध्ये शोषक आणि शोषित हे समान धार्मिक आणि पारंपारिक मूल्यांच्या प्रभावाखाली आहेत म्हणून इंडस्ट्रीमध्ये मालकाने सत्यनारायण घातला तर सगळा कामगार वर्ग त्या पूजेमध्ये मनःपूर्वक सहभागी होतो. त्यांना आपलं शोषण होतं हे कळतच नाही. ते न जाणवणे म्हणजे सांस्कृतिक क्षेत्रामधलं प्रभुत्व निर्माण करणं. ते प्रभुत्व या ६० कोटी मध्यमवर्गामध्ये ज्या नव्या नव्या कल्पना येतील त्या खाली झिरपतील. त्या कल्पनांमध्ये तुमची माझी लोकशाही अधिकाधिक अर्थपूर्ण करण्यात काहीही असणार नाही. कारण आता या वरच्या वर्गांना लोकशाही हे ओझं झालेलं आहे. जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा त्यांना नको असलेला काही भाग ते टाकून देणार. जेव्हा जेव्हा सोयीचा आहे तेव्हा त्यातला काही भाग जपून ठेवणार. जपून ठेवायचा भाग म्हणजे ग्रामशी म्हणतो तसे निवडणुका. टाकून द्यायचा भाग म्हणजे कॉन्स्टिट्यूशनल प्रॅक्टिसेस. आता तुमच्या लक्षात येईल की, हा देश कशा पद्धतीने पुढे जाणार आहे.

एकोणिसाव्या शतकामध्ये महात्मा फुले यांनी आपल्याला एक मंत्र दिला होता, 'विद्येविना मती गेली! मतीविना गती गेली! गतीविना नीती गेली! नीतीविना द्रव्य गेले! हे सगळे अनर्थ एका अविद्याने केले!' मी नेहमी गमतीनं असं सांगतो की, आजचे अनर्थ हे विद्येचे आहेत. सगळी विद्यावंत डोकी विकृत झालेली आहेत. फक्त माझा, चंगळवाद, उपभोग, नवी जीवनशैली, अधिकाधिक तंत्रज्ञान हा यांचा ध्यास असतो, म्हणून याचा परिणाम देशोदेशीच्या राज्यसंस्था कधी नव्हे एवढ्या बळकट आहेत. त्याचे एक कारण लष्कर, सैन्य, पोलीस हे आहेच. पण दुसऱ्या बाजूला सर्व माणसांच्या मनावर प्रभुत्व निर्माण करता येईल असं तंत्रज्ञान त्यांच्या दिमतीला आहे. अगदी तुमच्या डीएनएमध्ये बदल करण्याचा अधिकारसुद्धा राज्यसंस्था राखून आहेत. उद्या जर राज्यसंस्थेने निर्णय घेऊन विशिष्ट स्वरूपाची माणसं निर्माण करायची असे ठरवलं, तर त्यांना रोखणारं कोणी नाही. म्हणून गांधी म्हणत, 'मी प्रतिकार करेन, एकटा असलो तरी मी प्रतिकार करीन' ही भूमिका त्यांनी मांडली. राज्यसंस्था एवढ्या बलाढ्य आहेत की, तुम्ही प्रतिकारच करू शकत नाही. तंत्रज्ञान यांच्या हातात आहे. तुम्ही एखाद्या हॉटेलमध्ये संध्याकाळी गेलात, काहीतरी खाऊनही येता, तेव्हाच मोबाईलमध्ये मेसेज आलेला असतो. मध्यंतरी मुंबईमध्ये केस घडली. एक पेशंट हॉस्पिटलमध्ये होता. त्याचा डाएट डेटा हॉस्पिटलमध्ये होता. नंतर तो कंपन्याकडे ट्रान्सफर झाला. पेशंटला डिस्चार्ज मिळून घरी गेल्यानंतर त्याला मेसेज यायला लागतात. तुम्ही इतका काळ ॲडमिट होता. तुम्हाला अशा प्रकारचा डायट होता. हे तुम्हाला प्रिस्क्राइब केलेले आहे. या सगळ्या चांगल्या वस्तू आमच्या इथे मिळतील. मागणी नोंदवा. पेशंटला यातलं काहीही माहिती नसतं. हे परस्पर चालतं. म्हणजे तुमच्या अपरोक्ष चालणारी ही जगन्मान्य व्यवस्था आहे, याची आपणाला कल्पना नाही. ही कल्पना साठ कोटी मध्यमवर्ग आणि उच्च वर्गातील लोकांच्या डोक्यामधल्या तंत्रज्ञानाच्याआधारे चालते. हा

**(पृष्ठ क्रमांक २९ वर पहा )**

# विवेकी समाजनिर्मितीसाठी कार्यरत राहूया



**डॉ. बी. एम. हिर्डेकर,** कोल्हापूर
८८६२००५२६८

छत्रपती शाहू महाराजांच्या क्रांतिकारी, कार्याचा वारसा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यशाली चौफेर कार्याचा वारसा लाभलेल्या कोल्हापूर शहरात, करवीर नगरीत, पन्हाळ्याच्या ऐतिहासिक, निसर्गरम्य परिसरात समितीची राज्य कार्यकारिणी आयोजित केली आहे. संजीवन संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात, सामाजिक अभियंत्याचा एकत्र येवून विचारमंथन करण्याचा एक उत्तम प्रसंग आहे. या निमित्ताने जिल्हाध्यक्ष म्हणून आपल्या सर्वांचे स्वागत करताना मला विशेष आनंद होत आहे.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीचे उद्घाटन डॉ.बी.एम.हिर्डेकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले विचार...**

साथींनो, भारतीय विचारधारेत विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकी विचारधारा जरूर आहेत. तथापि, अशा स्वरूपाच्या प्रगत, ज्ञानपरंपरा तपासताना ग्रीकांच्या ज्ञानपरंपरेचाच संदर्भ घ्यावा लागतो. 'इसाप' होता की नाही यावर विवाद आहेत. पण त्याच्या काळापासून ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकापासून ग्रीक विचारवंत विश्वाचे आकलन, अवकाश, विज्ञान, शरीर विज्ञान, तसेच मानवी जीवनाशी संबंधित भौतिक विज्ञान आणि काही गूढ गोष्टींची चिकित्सा करीत होते. विज्ञाननिष्ठ समाजाच्या जडणघडणीची ती सुरुवात होती. सॉक्रेटिसपूर्व काळ आणि सॉक्रेटिस नंतरचा काळ या दोन्ही कालपर्वात जे जे विचारवंत होते त्यांनी केलेले मूलभूत काम, मांडणी ही आजच्या अतिप्रगत, विज्ञाननिष्ठ समाजाची पायाभरणी होती. ग्रीकांचे हे योगदान आजही अधोरेखित करावे असे मूलभूत, वैज्ञानिक, वैचारिक बैठक असलेले असेच आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती विज्ञाननिष्ठ समाज, समाजनिष्ठ समाज, समताधिष्ठित समाज, विवेकी समाज यांचा आग्रह धरणारी एक विज्ञाननिष्ठ चळवळ आहे. लिंग, जात, धर्म, पंथ, रंग, गरीब, श्रीमंत यावर आधारित कोणताही भेदाभेद न मानणारा समाज निर्माण करणे, वैश्विक मूल्ये मानणारा समाज निर्माण करणे अशी उदात्त ध्येये या चळवळीच्या धोरणाची प्रधान उद्दिष्टे आहेत.

केवळ याच गोष्टींवर समाधान न मानता यापुढे जाऊन, कृतिशील समाज, उत्पादक समाज, सृजनशील समाज, कलावंत, विचारवंत, साहित्यिक, शास्त्रज्ञ, समाजकारणी या सर्वांचा आदर करणारा समाज, मानवी स्वातंत्र्य आणि मानवी सभ्यता, सन्मान मानणारा, जपणारा समाज निर्माण करणे अशी महत्त्वाची वैचारिक बैठक, वैचारिक दिशा ठरवून काम करणारी ही संघटना आहे.

राज्यातून जमलेले सर्व कार्यकर्ते अशा समाजाच्या जडणघडणीचे शिल्पकार आहेत. 'अंधश्रद्धा निर्मूलन' समिती अनिष्ट, प्रथा, परंपरा, बुवाबाजी, भोंदूगिरी, कोणत्याही प्रकारचे शोषण याविरुद्ध लढणारी ही संघटना आहे. असे जरी असले तरी केवळ एवढेच काम ही संघटना करीत नाही, तर बरीच विधायक, नवे काही घडवणारी, Creative, Productive, Preventive असे महत्त्वाचे काम करणारी ही संघटना आहे.

खरं तर, समाजात घडणाऱ्या सर्वच अनिष्ट, वाईट गोष्टी माणसं शहाणी नाहीत (शिकलेली जरूर आहेत) म्हणून घडताहेत. म्हणून मग माणसं शहाणी करणं हे मोठं काम आपल्यापुढे आहे. अंनिसचे कार्यकर्ते म्हणजे माणसांना शहाणी करणारी माणसं, Wise human beings making more and more human beings wise, आदमी को इन्सान बनानेवाले लोग, अशी आपली ओळख आहे आणि ती महत्त्वाची ओळख आहे. We are messengers of wisdom, knowledge rationality. We are people with rationality in

brain and compassion in heart.

पाश्चिमात्त्य वैद्यकीय विद्येचा जनक समजला जाणारा प्राचीन ग्रीक वैद्य, वैद्यकशास्त्रातील थोर माणूस हिप्पोक्रेटस (इ.स. पूर्व ५ वे शतक) यांची एक प्रतिज्ञा आहे. वैद्यकशास्त्र शिक्षण घेवून बाहेर पडणारे डॉक्टर ही शपथ घेतात. या शपथेचा प्रतिज्ञेचा महत्त्वाचा भाग आपल्या कामाशी साधर्म्य सांगणारा आहे. आपण या प्रतिज्ञेचा विचार करावा असे मला वाटते. ती प्रतिज्ञा थोडक्यात अशी: 'आपल्या ज्ञानाचा, कौशल्याचा उपयोग मी रोग्यांना रोगमुक्त करण्यासाठी करीन. मी रोग्यांना अवाजवी अपाय होवू देणार नाही. जरूर पडेल तेव्हा मी इतरांचा सल्ला घेईन. रोग्यावर इलाज करताना अपयश आले तर अपयशातून मी धडा घेईन. माझे वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवन मी निष्कलंक ठेवीन.'

मला वाटतं, ही प्रतिज्ञा आपण समोर ठेवून काम करायला हवं. ग्रीसमधील ग्रीकांचे तत्त्वज्ञान हे सत्त्वभूत, तत्त्वभूत, मूलभूत तत्त्वज्ञान आहे. ते मानवी संस्कृतीचे अधिष्ठान आहे. सॉक्रेटिस, प्लेटो, ऑरिस्टॉटल, एपिक्युरस, डेमोक्रेट्स, एपिक्टेटस या तत्त्वज्ञांनी एक अमोल, अजोड असे काम केले आहे. Greek Philosophers humanised, moralised and publicised knowledge. आपल्याकडच्या पोथीनिष्ठ, साचेबद्ध मक्तेदारांनी बंदिस्त ठेवलेल्या ज्ञानाबाबत असे फार उशिरा झाले. तत्त्वज्ञान, तर्कज्ञान, बुद्धी, Reason याला बळकटी आणणारे निवडक का असेना ग्रीक तत्त्वज्ञान आपण अभ्यासायला हवे. बौद्धिक नम्रता, बौद्धिक प्रामाणिकपणा हे आपल्या वर्तनव्यवहाराचे प्रधान नियम असले पाहिजेत. बौद्धिक श्रेष्ठत्व, ज्येष्ठत्व, अहंमन्य, अहंभाव आपल्या वर्तनात असू नयेत. 'मी शहाणा आहे, मीच शहाणा आहे आणि तू किंवा तुम्ही सर्व मूर्ख आहात' या भूमिका घेवून काम करता येईल, असे मला वाटत नाही.

सॉक्रेटिसच्या विचारानुसार, I know that, I know nothing असे समजून आपण चालायला हवे. सॉक्रेटिससारखेच अविश्वास व्यक्त करा, आव्हान द्या, प्रश्न विचारा, मुद्दा उपस्थित करा अशी कार्यपद्धती कायम ठेवायला हवी. सभ्य, विचारी विवेकी माणसं म्हणजेच ज्ञानाची रूपे आहेत. त्या रूपात आपल्याला सदैव वावरायला हवे. आपल्यापुढे आज असंख्य प्रश्न, समस्या उभ्या आहेत. स्थानिक पातळीवरून वैश्विक पातळीपर्यंत समस्या आहेतच.

२१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात आपण आहोत. एका विचित्र परिप्रेक्ष्यात आपण जगतो आहोत. अतर्क्य, चंगळवादी, सत्तांध, मत्तांध Sadist, Faddist, Fascist, Racist अशा लोकांची गर्दी असलेल्या जगात आपल्याला उभे राहून काम करायचे आहे. हे एकाच वेळी आव्हान आहे; तसेच आवाहनही आहे. आपल्याला आता सहकार्य, सौहार्द, सामंजस्य, सलोखा या माध्यमातून अन्य संस्था, व्यक्ती, सरकारी, निमसरकारी, स्वसामर्थ्यावर काम करणाऱ्या संस्था यांच्याशी जोडून घेणे, हेही आवश्यक आहे. We are or we may be non profit organisation, but we are with purpose organisation. आपण एक उदात्त हेतू ठेवून काम करणारी संघटना आहोत.

आपण सर्वांनीच, सातत्याने आपले वैयक्तिक उदरनिर्वाहाचे काम प्रामाणिकपणे करीत, हे कामही निष्ठेने करायचे आहे. हे कार्य करीत असताना लागणारे आवश्यक ज्ञान, भावनिक बुद्धिमता, कौशल्ये आणि वृत्ती या सातत्याने विकसित करायला हव्यात. शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी आपल्याला अपेक्षित असलेला समाज घडविण्यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आदर्श काम केलेले आहे. तो वस्तुपाठ आपल्यापुढे ठेवून कार्यरत राहूया!

**(लेखक शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक व अंनिस कोल्हापूर जिल्ह्याचे अध्यक्ष आहेत.)**

●

**'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या आपल्या मासिका बाबत वाचकांच्या प्रतिक्रिया कळवाव्यात. अंकाबाबत काही सूचना किंवा काही अडचणी असतील, तर सोबतच्या मोबाईल नंबरवर (९३५९०८०८२०) संपर्क करा. तसेच महा.अंनिसच्या खबरबात सदरासाठी आपल्या जिल्ह्यातील किंवा शाखेतील एखाद्या उपक्रमांची माहिती व एक फोटा अनिल करवीर यांच्या व्हॉटस्ॲप नं. (९८२३२८०३२७) वरती किंवा इ-मेलवरती पाठवावा.**

**अजय भालकर** – व्यवस्थापकीय संपादक



# भारतीय संविधान निर्मितीतील महिला शिलेदार : दुर्गाबाई देशमुख

**डॉ. तृप्ती थोरात,** इस्लामपूर
८९९९२०१७६६

२६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान स्वतंत्र भारतात लागू झाले. यावर्षी म्हणजे २०२३ मध्ये संविधानाच्या अंमलबजावणीला ७३ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच यावर्षी आपण भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्षसुद्धा उत्साहाने साजरे करीत आहोत. या स्वतंत्र भारताचा हा पाऊण शतकाचा प्रवास सुखकर करण्यात भारतीय संविधानाचे अमूल्य योगदान आहे.

ज्या मनुस्मृतीने सामाजिक विषमतेवर आधारित गैरलागू शोषणव्यवस्था निर्माण केली, तिला कायदेशीर तडा देण्यासाठी अतिशय ताकदीच्या शासन प्रणालीची 'संविधान'या ग्रंथाद्वारे निर्मिती झाली. हे 'भारतीय संविधान' म्हणजे भारतीयांसाठी मानवमुक्तीचा जाहिरनामा होय. संविधानाच्या ७३ वर्षाच्या यशस्वी वाटचालीची अनुभूती आपण 'याची देही, याची डोळा' घेत आहोत. समाज जिवंत ठेवण्याची अनन्यसाधारण क्षमता असलेल्या या भारतीय संविधानात फुलेंचा उदारमतवादी आणि धर्माच्या कृतिशील चिकित्सेचा विधायक दृष्टिकोन, शाहूंचा समतेचा आग्रह, गांधींची अहिंसा, नेहरूंचं समाजकारण आणि राजकारण त्याचबरोबर आंबेडकरांचा अभ्यास, वैचारिक मांडणी, शोषण व्यवस्थेविरुद्धची चीड आणि मानवमुक्तीचा ध्यास या सर्वच गोष्टी प्रतिबिंबित होतात.



भारतीय राज्यघटनेच्या निर्मिती प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासह असलेल्या २९६ सदस्यांपैकी १५ सदस्य या अशा महिला होत्या की, ज्यांनी घटना समितीच्या सर्वच चर्चासत्रांमध्ये अनेक विषयांवर सांगोपांग चर्चा करून निर्भीडपणे मते मांडली. त्यांनी मांडलेल्या अनेक सूचना पुढे जाऊन घटनेच्या कलमांमध्ये परिवर्तित झाल्या. परंतु काही कारणांमुळे या महिलांचे राज्यघटनेच्या जडणघडणीतील योगदान दुर्लक्षितच राहिले. म्हणूनच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त या दुर्लक्षित हातांचे आभार मानण्याचा एक प्रयत्न छोट्याशा लेखमालेतून करीत आहोत.

भारतीय राज्यघटना मसुदा समितीवर दुर्गाबाई देशमुख यांची निवड मद्रास प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून झाली होती. मसुदा समितीच्या अध्यक्षीय मंडळावर त्या एकमेव स्त्री सदस्य होत्या. निराधार मुलं आणि युवक यांचे संरक्षण व विविध प्रकारच्या शोषणातून मुक्ती याबाबतच्या तरतुदी राज्यघटनेत समाविष्ट करण्याबाबत त्या आग्रही होत्या. वनचर प्राणी आणि पक्षी यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र संविधानिक कायदे असावेत ही सूचना त्यांनी केली. त्यांच्या सूचनेचा प्रभाव ४२व्या घटनादुरुस्तीनंतर कलम ३९ (फ) वरती दिसून येतो.

राज्यपालांची निवड थेट निवडणूक पद्धतीने झाली, तर या निवडीचे राजकारण होईल म्हणून राज्यपालांची निवड राष्ट्रपतींनी करावी; तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश हे स्वतंत्र भारताचे नागरिकच असावेत या बाबी त्यांच्या सूचनेनुसार संविधानात नमूद करण्यात आल्या. संविधानाच्या संरक्षणाची अंतिम जबाबदारीही सर्वोच्च न्यायालयाची असावी, असे त्यांचे मत होते.

दुर्गाबाई देशमुख यांचा राष्ट्रभाषेबाबतचा दृष्टिकोन देखील सर्वसमावेशक होता. संस्कृत प्रभावित हिंदी भाषेऐवजी सर्वसामान्यांना समजेल, अशी हिंदी भाषा कार्यालयीन कामकाजामध्ये वापरली जावी; तसेच घटनेच्या कलमांमध्ये 'कोणत्याही' या शब्दाऐवजी 'सर्व' हा शब्द वापरावा, असे त्यांचे मत होते. सध्याचं कलम (२५) २ ब मध्ये सांगितल्याप्रमाणे (सर्व समूहातील किंवा वर्गातील व्यक्तींना सार्वजनिक धार्मिक स्थळे यामध्ये मुक्त प्रवेश मिळेल) असा उल्लेख आला. एकूणच काही कलमांबाबतची संदिग्धता व किचकटपणा कमी होऊन अधिकाधिक स्पष्टता आणण्यावर त्यांचा भर होता.



# भुताळा-डाकीण आरोपातून वृद्ध दाम्पत्याची मुक्तता

**डॉ.टी.आर.गोराणे**, नाशिक
९४२०८२७९२४

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एका आदिवासी खेड्यातील भीमा बारकू तेलवडे व त्यांच्या पत्नी भागीबाई भीमा तेलवडे या वृद्ध दाम्पत्याला त्यांच्या भाऊबंदकीतील काही व्यक्तींनी मागील फेब्रुवारी महिन्यात अंधश्रद्धेतून भुताळा-डाकीण ठरवले होते. हे दाम्पत्य जादूटोणा करते, तंत्र-मंत्र, करणी करते. त्यांनी तंत्र-मंत्र केल्यानेच भीमा तेलवडे यांच्या सख्ख्या भावाचा मृत्यू झाला, असा आरोप करून भीमा तेलवडे व त्यांच्या पत्नी यांना काही व्यक्तींनी जबर मारहाण केली होती. त्यात भीमा तेलवडे यांच्या डोक्याला जखम झाली. त्यावेळी हरसूल पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर.सुद्धा दाखल झाला होता. मात्र या एफ.आय.आर.मध्ये भुताळा ठरवल्याच्या आरोपाची नोंद असूनही जादूटोणा प्रतिबंधक कायद्याचे कलम लावले गेले नाही, म्हणून या वृद्ध दाम्पत्याचा मुलगा रवी भीमा तेलवडे यांनी २० फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नाशिक जिल्हा शाखेकडे लेखी तक्रार केली होती. त्यानुसार त्याच दिवशी महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधानसचिव डॉ.ठकसेन गोराणे, राज्यकार्यवाह कृष्णा चांदगुडे, बुवाबाजी विरोधी संघर्ष जिल्हासचिव महेंद्र दातरंगे यांनी सदर वृद्ध दाम्पत्याला सिव्हिल हॉस्पिटल, नाशिक येथे उपचार करून घेतले व मा. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्यासमोर आणले. मा. पोलीस अधीक्षकांनी प्रकरण समजावून घेऊन, चौकशी करून पुढील कारवाई करण्याबद्दल आश्वस्त केले.

मात्र मागील पाच महिन्यांत भीमा तेलवडे व त्यांच्या कुटुंबियांना संबंधितांकडून दिला जाणारा त्रास कमी झाला नसल्याचे त्यांचा मुलगा रवी तेलवडे यांनी अंनिसच्या कार्यकर्त्यांकडे केली. आजही संबंधित इसम या कुटुंबियांना गावातील दुकानात येऊ देत नाहीत, त्यांना दमदाटी करतात; शेतात आले तर मारून टाकू अशा धमक्या देतात. अशी लेखी तक्रार रवी तेलवडे यांनी पुन्हा महाराष्ट्र अंनिसच्या नाशिक जिल्हा शाखेकडे दि.१०/७/२०२३ रोजी केलेली होती. यावेळी मात्र मा. पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या आश्वासनानुसार कारवाई व्हावी, यासाठी महाराष्ट्र अंनिसच्या जिल्हा शाखेने पाठपुरावा करण्याचे ठरवले. त्यानुसार मंगळवार, दि.१८ जुलै, २०२३ रोजी हरसूल, पोलीस स्टेशनचे ए.पी.आय. गणेश म्हस्के साहेब यांच्या तीन सहकाऱ्यांसह महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधानसचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य सदस्य प्रल्हाद मिस्त्री, नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. श्यामसुंदर झळके, त्र्यंबकेश्वर शाखेचे कार्याध्यक्ष संजय हरळे, नाशिक शहर शाखेच्या कार्यकर्त्या विजया गोराणे हे सर्व कार्यकर्ते कळमुस्ते (हरसूल) या आदिवासीबहुल गावात पोहोचले. पीडित कुटुंब आणि सामनेवाले यांना समोरासमोर आणून दोन्ही बाजूंकडील म्हणणे त्यांनी ऐकून घेतले. यावेळी गावचे सरपंच हिरामण चावरे, पोलीस पाटील चिंतामण शिंदे तसेच काही गावकरी देखील उपस्थित होते.



त्यानंतर या गावबैठकीत महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी डाकीण-भुताळा या अनिष्ट, अघोरी प्रथेबद्दल आणि एकूणच आदिवासी भागातील अंधश्रद्धा याबद्दलची कारणमीमांसा स्पष्ट केली. ज्यामुळे डाकीण

किंवा भुताळा अशा अंधश्रद्धा निर्माण होतात अशा काही चमत्कारांची प्रात्यक्षिके डॉ. गोराणे यांनी सादर करून लोकांचे प्रबोधन केले. प्रबोधनपर बोलताना डॉ. गोराणे पुढे म्हणाले की, ''हे वैज्ञानिक प्रयोग असून शिक्षणाच्या अभावातूनच हे आपल्याला दैवी चमत्कार वाटत असतात आणि डाकीण किंवा भुताळा अशा अंधश्रद्धा वाढतात. शिक्षणाच्या अभावामुळेच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित न झाल्याने, अद्याप टिकून असलेले अज्ञान, प्रथा, परंपरांचा पगडा, आरोग्याच्या अपुऱ्या सोयी-सुविधा अशा अनेक कारणांमुळे अंधश्रद्धांच्या विविध प्रकारांवर आजही आपण विश्वास ठेवतो. अंधश्रद्धेतून उद्‌भवलेल्या समस्या व आजार यांवर इलाज करून घेण्यासाठी भगत, देवऋषी यांच्याकडे जातो. तो दैवी तोडगे, अशास्त्रीय, अवैद्यकीय व अघोरी उपचार करून, आपला जीव धोक्यात आणतोच; परंतु आपले विविध प्रकारे शोषण करतो आणि स्वतःचा स्वार्थ साधतो. गावातीलच एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना भुताळा, भुताळीण, डाकीण असल्याचे तोच लोकांना सांगतो. त्यामुळे स्थानिक पातळीवर वैरभाव निर्माण होतात व माणसे एकमेकांना दुरावतात. डाकीण-भुताळीण ठरवलेल्या व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबांना दैनंदिन जीवन जगणे मुश्किल होते. त्यामुळे त्यांचे जीवन धोक्यात येते.''

पोलीस हवालदार एस.के.ठाकरे, एच.पी.गवळी, पोलीस नाईक आर. बी. गवळी यांनी जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा याबाबत उपस्थित गावकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. ''अंधश्रद्धा या माणसांचे जीवन संपवतात, उद्‌ध्वस्त करतात. म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. भगत, देवऋषी यांच्याकडे जाऊ नका. त्यांच्या नादी लागू नका. तो तुम्हाला फसवतो. विविध प्रकारे लुटतो. असा कोणी भगत, देवऋषी आपल्या परिसरात असेल तर, पोलीस स्टेशनमध्ये कळवा. त्याच्यावर कायदेशीर कारवाई जाईल'', असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.


यानंतर जादूटोणा असा काही प्रकार नसतोच, हे सप्रयोग दाखविण्यासाठी, याबाबत उपस्थितांना आश्वस्त करण्यासाठी डॉ. गोराणे यांनी पीडित कुटुंबाच्या घरातील भात मागविला. तो सर्वांसमोर सेवन केला. ''जर पीडित कुटुंब हे जादूटोणा, करणी-भानामती करत असतील तर आम्हालाही त्यांच्या घरातील अन्नसेवन केल्याने त्रास होईल. तरी आम्ही ते स्वेच्छेने सेवन करीत आहोत. आमचा असा विश्वास आहे की, अशा प्रकारचा जादूटोणा, मंत्र, तंत्र, करणी, भानामती असे कोणत्याही प्रकारचे दैवी चमत्कार नसतात. तेव्हा आपणही अशा अवैज्ञानिक, कालबाह्य गोष्टींवर विश्वास ठेवू नये'', असे कार्यकर्त्यांनी उपस्थितांचे प्रबोधन करीत त्यांनाही आपल्यासोबत भात खाण्याचे आवाहन केले.

त्यानंतर उपस्थितांपैकी पोलिसांनी आणि गावकऱ्यांनी कार्यकर्त्यांसमवेत भात खाल्ला. त्यामुळे वातावरण अतिशय हलकेफुलके झाले. नंतर पीडित कुटुंब आणि सामनेवाले यांना समोरासमोर आणून त्यांचे अंधश्रद्धाविषयक विचार दूर झाले असतील, तर एकमेकांला साखर भरवण्यास कार्यकर्त्यांनी विनंती केली. त्यांनीही तसे केले. यापुढे आम्ही कोणावरही अंधश्रद्धेतून अथवा कोणत्याही कारणास्तव आरोप करणार नाहीत. कोणाबद्दलही संशय व संभ्रम निर्माण करणार नाही. कुणालाही बदनाम करणार नाही. गुण्यागोविंदाने राहू, असे उपस्थितांसमोर सांगण्याची विनंती केली. त्यांनी त्याप्रमाणे आपली मते व्यक्त केली. डाकीण- भुताळीण या अनिष्ट, अघोरी आरोपातून मुक्त झाल्याचा आनंद वृद्ध दाम्पत्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

**(लेखक महा.अंनिसचे राज्यप्रधान सचिव आहेत.)**

•

**विनम्र अभिवादन**



**गुम्मडी विठ्ठल राव उर्फ गदर**

ज्यांच्या गाण्यांनी जनसामान्यात
जन चेतना फुलवली त्या
लोकशाहिरास क्रांतिकारक अभिवादन

# ...तर तुमच्यासाठी बोलायला कोणीच उरणार नाही!



**यशवंती शिंदे,** कोल्हापूर
८८३०१७९१५७

दि. ४ मे २०२३ रोजी मणिपूरमधील मैतेयी आणि कुकी या दोन समुदायांमधील हिंसाचारामध्ये दोन महिलांना विवस्त्र करून त्यांची रस्त्यावरून नग्न धिंड काढण्यात आल्याचा व्हिडिओ नुकताच सोशल मीडियावरून व्हायरल झाला. व्हिडिओमध्ये दोन कुकी स्त्रियांच्या शरीराला घाणेरडे स्पर्श करत, दाबत त्यांच्या आत्मसन्मानाच्या चिंधड्या उडवत एक मोठा जनसमुदाय त्यांना घेऊन जात होता. त्या ओरडत आहेत, रडत आहेत, विव्हळत आहेत, पण त्या जमावाला काहीही फरक पडत नाही. जनावरांनाही लाजवेल अशा प्रकारचे निंद्य आणि गलिच्छ कृत्य त्यांच्यासोबत केले गेले. गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये मणिपूरमध्ये अमानुष अत्याचाराच्या अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. त्या आता हळूहळू समोर येत आहेत.

**मणीपूरमधील वांशिक संघर्ष, स्त्रियांवरील अमानुष अत्याचार, हत्याकांडे व क्रौर्य, शासनसत्तेची पक्षपाती व घटनाबाह्य भूमिका, समाजाची उदासिनता व असंवेदनशीलता, अशा घटनांचे होणारे दूरगामी दुष्परिणाम, यांचे केलेले परखड विश्लेषण...**

जो व्हिडिओ सोशल मीडियावरती व्हायरल झाला, तो एक स्त्री म्हणून अंगाचा थरकाप उडविणारा होता. आपल्या इच्छेविरुद्ध किंवा नकळतपणेदेखील आपल्याकडे कुणी पाहात असेल, आपल्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत असेल तर अपमानास्पद वाटते, हे कृत्य करणाऱ्या व्यक्तीची घृणा वाटते, आपल्या तळपायाची आग मस्तकाला जाते हा आपला प्रत्येकीचा अनुभव असतो. मग या कुकी समाजातील स्त्रियांच्या वाट्याला जिवंतपणी ज्या मरणयातना अनुभवास आल्या, त्यावेळी त्यांना काय वाटले असेल?

कुठेही दंगली घडल्या की, त्यांची परिसीमा गाठली जाते ती स्त्रियांच्यावरील अत्याचारांतून. स्त्रीला शिवीगाळ करायची, अश्लीलपणे बोलायचे, तिला मारहाण करायची, तिच्यावर बलात्कार करायचे आणि एकट्याने अथवा सामूहिकरीत्या जसं जमेल तशी तिची विटंबना करायची. एका समूहाला दुसऱ्या समूहासमोर आपली दहशत बसवून मर्दुमकी दाखवायची असेल तर त्यांच्यातल्या स्त्रिया विटंबित करायच्या, हा रानटी मार्ग अवलंबला जातो. क्रूरता इतकी डोक्यात भिनते की, तिथे पशूंनाही लाज वाटावी!

ही घटना ४ मे ला घडली असं सांगितलं जातं आणि इंटरनेटची सुविधा बंद असल्यामुळे ती २० जुलै रोजी समाजमाध्यमांसमोर येते. त्याच्यावर सर्वोच्च न्यायालय सरकारला खडसावते आणि मग आपल्या देशाचे प्रधानसेवक काही सेकंद त्याच्यावर बोलतात. हे सगळं होत असताना पोलीस यंत्रणा काय करत होती? त्या राज्याचे मुख्यमंत्री काय करत होते? घटनेत सहभागी असणाऱ्या हजारो पुरुषांमधल्या एकालाही असं वाटलं नाही का की हे चुकीचे आहे? हे घडता कामा नये? यांसारखे अनेक प्रश्न मनात थैमान घालतात. आपल्याकडे नेहमी तालिबानी, इसिस यांच्या दहशतवादाची उदाहरणे दिली जातात. काही न घडलेल्या कथा 'ट्रू स्टोरी' म्हणून दाखवत, त्यांच्यावर सिनेमे बनवले जातात. त्यांना पाहाणारा एक वर्ग तयार झालेला आहे. असा वर्ग मणिपूरमध्ये घडलेल्या हिंसेवर साधं बोलायलाही कसा तयार नाही याचे आश्चर्य वाटते.

एक समाज म्हणून आपण काय करतो? या गोष्टी समाजमाध्यमांवर वाचतो, ऐकतो, दुःखद उसासे टाकतो आणि विषय सोडून देतो. असे का घडते? आपल्यातले माणूसपण संपले आहे का? माझ्यासह अनेकांचा असा अनुभव आहे की, या घडल्या प्रकाराबद्दल अनेक ग्रुप्सवर हे मेसेस फॉरवर्ड केले, त्यावर काही चळवळींचे ग्रुप वगळता इतर कुठल्याही ग्रुपवर एकालाही आपला निषेध

नोंदवावासा वाटला नाही. याची कारणे काय असावीत? की स्त्रिया या अन्याय, अत्याचार सहन करण्यासाठीच जन्माला आलेल्या असतात, रोज कुठे ना कुठेतरी त्यांच्यावर हिंसा होतच असते, ती आज उघडकीला आली, म्हणून त्याच्यावर काय बोलायचे? अशी तरी आपली मानसिकता बनली नाही ना?

समाजात घडणाऱ्या चुकीच्या कृत्यांबद्दल आपण कसलाही निषेध नोंदवायचा नाही, जे चालले आहे ते निमूट बघत राहायचे. कारण ज्यांची अब्रू लुटली, ज्यांची विटंबना केली, ज्यांचं माणूसपण हिरावून घेतलं गेलं; त्या तुमच्या कुणीच नाहीत. त्या तुमच्या समाजातल्या नाहीत, तुमच्या जातीतल्या नाहीत, तुमच्या मुली नाहीत, तुमच्या बहिणी नाहीत, तुम्ही स्वतः स्त्री असाल तर त्या तुम्ही नाही. जो भोग कुकी मुलींच्या वाट्याला आला तो भोग तुम्ही भोगलेला नाही. त्यामुळे इतक्या स्वार्थीपणे आपण सुरक्षित आहोत म्हणून, तुम्हाला त्याविषयी काहीच बोलावे असे वाटले नाही, असेच ना?




आपल्या देशातल्या पूर्वेकडच्या एका राज्यातील स्त्रियांवर पाशवी अत्याचार झाले, त्या अत्याचारांची झळ तुम्हाला लागलेली नाही याचा अर्थ असा समजू नका की, तुम्ही सुरक्षित आहात, तुमच्या लेकीबाळी सुरक्षित आहेत. तुमच्या मुलीच्या, बहिणीच्या, तुमच्या वाट्याला हा प्रसंग येणारच नाही, याची आज कोण खात्री देऊ शकते का? तसं जर वाटत नसेल तर का तुमच्या मुठी वळल्या नाहीत? का तुमचा थरकाप झाला नाही? का तुम्हाला निषेध नोंदवावासा वाटला नाही? साधं पिशवीत गोमांस आहे या संशयावरून इथे माणसांच्या कत्तली होतात, त्याच समाजात स्त्रियांची दिवसाढवळ्या पुरुषांकडून विवस्त्र करून धिंड काढली जाते, इतकी स्त्री कवडीमोल आणि स्वस्त झाली काय? आपण कुठल्या समाजात राहातो आहोत?

तुम्ही देशाच्या कुठल्याही भागात राहात असा; एक लक्षात घ्या, तुम्ही स्त्री म्हणून कुठेही सुरक्षित नाही आहात. मणिपूरच्या अत्याचारग्रस्त मुली जात्यात तर तुम्ही सुपात आहात. कारण अलीकडच्या काही वर्षांमध्ये आपण देशभर पाहात आहोत की, कशा प्रकारे जाणीवपूर्वक एका समाजातील लोकांविरुद्ध दुसऱ्या समाजाला भडकविण्याचं घाणेरडं राजकारण केलं जात आहे, विद्वेष पसरवला जात आहे, उन्माद निर्माण केला जात आहे. त्यावेळी जी भडकलेली मस्तके असतील, तीदेखील अशाच प्रकारचे क्रौर्य करायला मागेपुढे पाहाणार नाहीत. गुजरात येथे २००२ साली घडलेल्या दंगलीत बिल्किस बानोवरती ज्या नराधमांनी बलात्कार केले, त्याचे उदाहरण आपण अजून विसरलेलो नाही (ते नराधम आज समाजात मुक्तपणे फिरत आहेत).

कुठल्याही समाजाला आपले वर्चस्व गाजवायला, बदला घ्यायला, अपमान करायला स्त्रिया हे सोपं साधन वाटतं. शारीरिक ताकद पुरुषांपेक्षा कमी असल्यामुळे त्या सहजगत्या वाकवता, झुकवता आणि भ्रष्ट करता येतात. स्त्रियांचा उदो उदो करण्यासाठी बऱ्याचदा देशातल्या स्त्रिया, मुलींना देवता, भारतमाता वगैरे म्हणून देवत्व बहाल केले जाते. 'भारतमाता की जय', 'वंदे मातरम' या घोषणा देतानाचा कंठशोष जगण्यात का उतरत नाही? या घोषणांतील भारतमाता देशातील मुली-स्त्रियांमध्ये का दिसत नाही? आज आपण स्वतःला उच्चशिक्षित म्हणवतो. पण आपल्यातल्याच काहींच्या वाट्याला

पाशवी हिंसा अनुभवास येते आणि देशाच्या दुसऱ्या भागात राहाणाऱ्या आपणांपैकी कुणाचेही हृदय हेलावत नाही, पिळवटत नाही, आक्रोश करत नाही, आपण मूग गिळून गप्प बसतो, हे सारे काय आहे?

आपला भारत देश जगातली सगळ्यात मोठी लोकशाही म्हणून ओळखला जातो. पण आज इथल्या राजकारणाने इतकी खालची पातळी गाठली आहे की, आपल्या देशातल्या लोकशाहीचा, मानवतेचा एक प्रकारे खून केला जात आहे. देश म्हणजे देशातील माणसे हेच विसरले जात आहे. एका समुदायातले पुरुष दुसऱ्या समुदायातल्या स्त्रियांना नग्न करून एक प्रकारे लोकशाहीचीच धिंड काढत आहेत, हे आपल्या ध्यानात कधी येणार?

गेल्या दोन महिन्यांपासून या घटना मणिपूरमध्ये घडत असताना आपल्यासमोर उघड झालेली ही नमुन्यादाखलची घटना. अशा कितीतरी गोष्टी उजेडात न आल्यामुळे गडप झाल्या असतील. सर्वांत खेदाची गोष्ट म्हणजे ज्या सरकारच्या विश्वासावर मणिपूरमधील जनता आपल्याला मदत मिळेल, आपण आज जो दिवस भोगतोय तो शेवटचा दिवस असेल या आशेने वाट पाहात आहे; त्या सरकारला याच्यावर बोलण्यासाठी दोन महिने लागतात. दोन महिन्यांपर्यंत तिकडे काय चालले आहे, याची साधी चौकशीही करावीशी वाटत नाही. 'मणिपूरमध्ये अशा घटना रोजच घडतात', हे मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांचे विधान अत्यंत धक्कादायक असून त्यांच्या घटनात्मक कर्तव्याचे थेट उल्लंघन आहे.

सरकार निष्क्रिय आहे म्हणून आपण आपल्या प्रिय देशाचा जळणारा भाग बघत निमूटपणे गप्प बसायचे का? आज ज्या प्रकारे जाणीवपूर्वक दुहीचे, विद्वेषाचे विष पेरले जात आहे, ते पाहाता तो दिवस दूर नाही, ज्या दिवशी मणिपूरच्या आगीचा डोंब आपल्या गल्ल्यांच्या बोळांतून आपल्या घरापर्यंत येईल म्हणून आपण बोलले पाहिजे, झाल्या प्रकाराचा शक्य त्या माध्यमांतून निषेध केला पाहिजे. मणिपूरच्या कुकी समाजाच्या आक्रोशात आपलाही निषेधाचा स्वर मिसळला पाहिजे. आम्हाला असा विद्वेषी, हिंस्र, पाशवी समाज नको; तर संवेदनशील, शांततामय सहजीवन जगणारा समाज हवा आहे, हे या नराधमांना आणि सरकारला कृतीने दाखवून दिले पाहिजे. कारण आपण आज जर यावर बोललो नाही, तर जर्मन कवी मार्टिन निमोलर यांनी म्हटल्याप्रमाणे

आधी ते कम्युनिस्टांसाठी आले,
तेव्हा मी बोललो नाही,
कारण मी कम्युनिस्ट नव्हतो!
मग ते समाजवाद्यांसाठी आले,
तेव्हाही मी बोललो नाही,
कारण मी समाजवादी नव्हतो!
मग ते कामगारांसाठी आले,
पण मी बोललो नाही,
कारण मी कामगार नव्हतो!
मग ते यहुद्यांसाठी आले,
पण मी बोललो नाही,
कारण मी ज्यू नव्हतो!
मग ते माझ्यासाठी आले,
...पण तोपर्यंत
माझ्यासाठी बोलायला कोणीच उरले नव्हते!

**(लेखिका अंनिस कोल्हापूर शहर कार्याध्यक्षा आहेत.)**

•


महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे

**विवेक जागर प्रकाशन**

***महा. अंनिसच्या विवेक जागर प्रकाशनाची आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीशी संबंधीत पुस्तके ४० ते ५० टक्के पर्यंत उपलब्ध आहेत.***

**संपर्क** : नवल ठाकरे : ९५२७२०६०५७

Scan & Pay

खात्याचे नाव : **विवेक जागर संस्था**
बँकेचे नाव : ICICI Bank, मुंदडा मार्केट, धुळे
खाते क्र.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463


वरील मो.नं.वरती रक्कम पाठवल्याचा स्क्रीनशॉट पाठवावा.



# कर्मवीर भाऊराव पाटील आणि समाजसुधारणा

**डॉ. धनाजी मासाळ,** सातारा
९८६०६८१८३८

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते आणि रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राला दिशा देणारे समाजसुधारक अशी महाराष्ट्राला ओळख असणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचे राष्ट्रउभारणीमध्ये निःसंशयपणे मोठे योगदान आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाबाई यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांच्या विचारांचा व आचारांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न कर्मवीरांनी केला. त्यामुळे त्यांच्याकडून मोठे समाजकार्य पार पडले.



**समाजसुधारकाची जडणघडण**

कर्मवीरांनी कोल्हापूरमध्ये राजाराम हायस्कूलला प्रवेश घेतला. जैन दिगंबर वसतिगृहात राहाण्याची सोय झाली. अण्णासाहेब लठ्ठे वसतिगृहाचे रेक्टर होते. अस्पृश्य मुलांच्या मिस क्लार्क वसतिगृहाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी गेल्याचे निमित्त झाले आणि कर्मवीरांना लठ्ठे यांनी वसतिगृहातून बाहेर काढल्यानंतर खानविलकर या मित्राच्या ओळखीने राजर्षी शाहू महाराजांकडे गेले. कर्मवीरांचा सुधारणावादी आधुनिक विचार शाहू महाराजांना आवडला आणि राजवाड्यात तालमीत मुक्कामाची सोय झाली. येथेच राजर्षी शाहू महाराजांच्या सत्यशोधकी व समाजसुधारणावादी विचारसरणीचा प्रभाव कर्मवीरांवर पडला. जातीभेद निर्मूलन,धार्मिक कर्मकांड व पुरोहितशाहीला विरोध, सामाजिक समता प्रस्थापित करणे, स्त्री–पुरुष भेदभाव नष्ट करणे, सामाजिक प्रबोधन करून बदलासाठी मानसिकता तयार करणे इत्यादी. याच विचारसरणीचा प्रभाव कर्मवीरांच्या समाजसुधारणा कार्यावर दिसून येतो.

**सत्यशोधक समाजाचे महाराष्ट्रासाठी दिलेले सर्वात मोठे योगदान म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील व रयत शिक्षण संस्था. सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त कर्मवीरांवरील सत्यशोधक समाजाचा प्रभाव व त्यांचे कार्य अधोरेखित करणारा लेख...**

**सत्यशोधक विचारांचा प्रसार आणि प्रचार**

शाहू महाराजांच्या सहवासात संस्कारक्षम वयात राहिल्याने महात्मा फुले व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे महत्त्व कर्मवीरांना पटले. सत्यशोधक समाजाच्या मार्गाने बहुजनांना जागृत करून शिक्षण देवून संघटित करून त्यांचे सबलीकरण करावे, हा विचार त्यांना सामाजिक सुधारणेच्या कार्यासाठी प्रवृत्त करू लागला. सत्यशोधक समाजाच्या परिषदा, जलसे व विविध कार्यक्रमातून सहभागी होण्याबरोबर त्यांच्या आयोजनासाठी कर्मवीरांनी काम केले. सत्यशोधक समाजाचा विचार, तत्त्वे व वारसा हाच कर्मवीरांच्या समाजसुधारणेच्या कार्याचा पाया होता. सत्यशोधक समाज आणि त्याची तत्त्वे यांना अनुसरून आयुष्यभर काम करीत राहिले.

कर्मवीरांनी आपल्या कार्याची सुरुवात सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथे दुधगाव शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेने केली. संस्थेमार्फत चालविलेले वसतिगृह आणि आश्रम सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी होते. त्यांचे हे वसतिगृह म्हणजे सत्यशोधक समाजाचे आणि महात्मा फुले यांचे विचार प्रत्यक्षात उतरविण्याची पहिली धडपड होती. अनेक जातीचे विद्यार्थी एकाच वसतिगृहात राहात असल्याने हळूहळू त्यांच्या मनातील जातिभेदाची भावना दूर होण्यास मदत होत असे व घेतलेल्या शिक्षणाने त्यांच्या विचारसरणीत बदल होत होता. अशी अनेक वसतिगृहे सुरू करण्याचा त्यांचा विचार पुढे त्यांनी रयत शिक्षण

संस्थेच्या माध्यमातून सत्यात उतरविला व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक वसतिगृहे सुरू केली.

जातीभेद निर्मूलन करण्याचे व त्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे वसतिगृह. कर्मवीरांनी सुरू केलेली वसतिगृहे सत्यशोधक समाजाच्या विचार आणि प्रचाराची केंद्रे होती. जातीभेद नष्ट करण्याबरोबरच विद्यार्थी वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांवर सत्यशोधक समाजाचे संस्कार केले जात होते. कमवा आणि शिका योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वाभिमानी व स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला. स्वावलंबन-स्वाभिमान-स्वाध्याय-समता या चतु:सूत्रीचा अवलंब करून सत्यशोधक समाजाचे शिलेदार निर्माण केले जात होते. कराड तालुक्यात काले या गावी सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. या परिषदेमध्ये बहुजनांच्या शिक्षणासाठी शिक्षण संस्था स्थापना करण्याचे ठरले. अशी शिक्षण संस्था स्थापन करणे आणि तिची देखभाल करण्याचे काम कर्मवीरांनी आपल्या खांद्यावर घेतले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आजीव सेवक व आजीव सभासदांची फळी निर्माण करून सत्यशोधक समाजाची धुरा वाहाणारी पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्थापन केलेल्या वसतिगृहांना व शाळा महाविद्यालयांना ज्या कर्तृत्ववान स्त्री-पुरुषांची नावे दिली त्यावरून त्यांचा समाजसुधारणेचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

**रयत शिक्षण संस्था**

रयत म्हणजेच तळागाळातील लोक व त्यांना समाजप्रवाहात आणण्याबरोबरच त्यांच्या प्रगतीचा विचार संस्थेला रयत हे नाव देण्यापाठीमागे दिसून येतो. दुर्गम भाग, मागासलेली वस्ती, बहुजन समाज, स्त्रिया अशा घटकांच्या शैक्षणिक विकासावर भर दिला. मागासलेल्या समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी खास प्रयत्न करण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणावर भर दिला. १९३६ साली पहिली शाळा साताऱ्याजवळ यवतेश्वर येथे सुरू केली. १९४८ पर्यंत ५७८ प्राथमिक शाळा महाराष्ट्रात सुरू केल्या. १९४८ साली सरकारी धोरणाने सर्व शाळा जिल्हा लोकल बोर्डाकडे वर्ग कराव्या लागल्या. त्यानंतर संस्थेने माध्यमिक शिक्षणावर भर देऊन शेकडो विद्यालये व महाविद्यालये सुरू केली. या शाळा व महाविद्यालयांतून कोट्यावधी तरुणांनी शिक्षण प्राप्त केले. संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळात पहिले महाविद्यालय छत्रपती शिवाजी कॉलेज free and residential College सुरू केले. उच्च व श्रीमंत वर्गातील फी भरून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांना पुणे, मुंबई, सांगली अथवा कोल्हापूर येथे जाऊन उच्च शिक्षण घेता येत होते. कर्मवीरांचा दृष्टिकोन गोरगरिबांना व मागासलेल्या घटकांना शिक्षण देण्याचा असल्याने श्रीमंत व उच्चवर्गीय समजणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नव्हता.

**महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राला दिशा**

कर्मवीरांनी शिक्षणाच्या क्षेत्रात जे प्रयोग केले, ते यापूर्वी महाराष्ट्रात कोणीही केले नव्हते. महात्मा गांधींनी १९२७ साली कर्मवीरांनी सुरू केलेल्या वसतिगृहास भेट दिली आणि सर्व जाती-धर्माची मुले एकत्र राहात असल्याचे पाहून त्यांना सुखद आश्चर्य वाटले. त्यांनी म्हटले होते की, 'साबरमती आश्रमात मी जे करू शकलो नाही ते आपण या छोट्याशा झोपडीत करून दाखविले'. अनेक जातीधर्माचे विद्यार्थी एकत्र राहून स्वावलंबनाने शिक्षण घेतात ही बाब गांधीजींना आवडली व त्याचबरोबर गांधीजींनी हरिजन सेवक फंडातून वार्षिक ५०० रुपये अनुदान रयत शिक्षण संस्थेस देण्यास सुरुवात केली. महात्मा गांधीजींच्या या भेटीने भाऊराव प्रभावित झाले होते व तेव्हापासून त्यांनी खादीची कपडे वापरण्यास सुरुवात केली.

विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाने शिक्षण घ्यावे, यासाठी कर्मवीरांनी कमवा आणि शिका ही अभिनव योजना सुरू केली. या योजनेत मुलांना शेतीची सर्व कामे करणे, जनावरे सांभाळणे, मुरूम खोदणे, खडी फोडणे, सुतारकाम, विटा तयार करणे, विहीर खोदणे, गवंडीकाम अशी अनेक प्रकारची अंगमेहनतीची व कौशल्याची कामे करावी लागत होती. अशी कामे करूनही बुद्धीवर किंवा यशावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही, हे त्यांनी दाखवून दिले. काया, वाचा, मन या विविध माध्यमांतून शिक्षण आत्मसात करावे, असा कर्मवीरांचा दृष्टिकोन होता. रयत शिक्षण संस्थेतील विविध शैक्षणिक प्रयोगाद्वारे स्वावलंबी शिक्षण, श्रममहात्म्य, कमवा व शिका योजना महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रापुढे ठेवली.

**समारोप**

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेशिवाय शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याच्या कामी प्रत्यक्ष सहभाग व राज्य प्राथमिक शिक्षण संघटनेला बहुमोल

मार्गदर्शन केले. कामगारांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था यासाठी जाणीवपूर्वक सातत्याने प्रयत्न केले. सातारा जिल्ह्यातील कोरेगाव येथे गरीब शेतकऱ्यांसाठी सहकारी शेती योजना राबविली. गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य व बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सौ. लक्ष्मीबाई पाटील फंडाची योजना निर्माण केली. खऱ्या अर्थाने त्यांनी समाजाला पुरोगामी बनविण्यासाठी शिक्षण या साधनाचा वापर केला. सनातनी विचारांच्या लोकांकडून त्यांना प्रचंड विरोध व त्रास सहन करावा लागला. एवढेच नव्हे, तर स्वतःच्या आई-वडिलांचा रोष ओढवून घ्यावा लागला. मात्र असा प्रचंड विरोध व त्रास सहन करण्याचे धैर्य त्यांच्या ठिकाणी असलेल्या ध्येयवादाने निर्माण केले होते. त्यांची विचारसरणी पुढे नेण्याचे काम त्यांच्या रयत शिक्षण संस्थेचे हजारो विद्यार्थी करीत आहेत.

**(लेखक शिवाजी कॉलेज, सातारा येथे इतिहास विभाग प्रमुख आहेत.)**

●

## कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मुलास पत्र

कर्मवीर भाऊराव पाटील
संस्थापक, रयत शिक्षण संस्था, सातारा.
ता.२६/३/१९५२.

चि. आप्पासाहेब यास,

अनेक आशीर्वाद! पिता या नात्याने तुला जन्म देणे या पलीकडे मी तुझ्यासाठी काही एक केलेले नाही. एवढेच नव्हे तर तुझ्या मातेचा शेवटचा सौभाग्य अलंकार, तोही मी हिरावून घेतला व तुझ्या मातेची जन्मभर सेवा करता करता त्यातच तिचा अंत झाला. तेव्हा तू त्यागी माता-पित्याचा पुत्र आहेस व त्यागी घराण्यातील तू एक सुपुत्र आहेस व यातच सौख्य मानावयास पाहिजे. तुझे बरे व्हावे म्हणून माझे मेहुणे श्री. आदगौंडा पाटील यांनी तुला विमा धंद्याचे मार्गदर्शन केले व स्वतःचा २०,००० रुपयांचा विमा उतरला व नंतर ते चार महिन्यांनी वारले.

तू नोकरी करू नये, अशी माझी पहिल्यापासून फारच इच्छा होती व आजही आहे. संस्थेच्या ज्या स्टोअर्समध्ये तू काम करीत आहेस, त्या स्टोअर्सला चालू वर्षी फारसा नफा झालेला नाही, यापुढेही मुळीच होणार नाही. त्यामुळे स्टोअर्सला नोकर कमी करावे लागतील, त्यात तुला कमी न करता दुसऱ्यास कमी करावे लागेल, हे स्वाभाविक आहे. अशावेळी तू नोकरी सोडावीस व विमा कंपनीचा अगर इतर धंदा तू करावास, अशी माझी तुला प्रेमाची सूचना आहे. काही दिवस तुला थोडे जड वाटेल. परंतु स्वतंत्र रीतीने तू आपल्या पायावर उभा राहिल्यास त्यातच तुला आनंद वाटेल. वडिलांकडून तुला आतापर्यंत काही मदत मिळालेली नाही व यापुढेही मिळणार नाही. तरी तू गरिबीचा संसार करून स्वावलंबी बनावे.

शेवटची माझी नम्र सूचना अशी आहे की, माझ्या पूज्य मातोश्रीस तू जपावे व सांभाळावे. तिच्या खर्चाकरिता ऐतवडे येथील शेतीचे येणारे अंदाजे वार्षिक उत्पन्न रुपये ३०० ते ५०० हे मी तुला देत जाईन. कदाचित मीही असमर्थ झालो तर माझादेखील भार तुला सहन करावा लागेल. याकरिताच तू स्वावलंबी व्हावे अशी माझी तुला सूचना आहे. कळावे, हा आशीर्वाद.


तुझा,
(B.P. PATIL)

# वयात येताना... स्वतःला जाणूया!



**डॉ. भगवान फाळके,** अमरावती
९६५७४४९५६५

जीवनातील व्यवहाराच्या विविध क्षेत्रांत आज मोठी प्रगती झालेली दिसून येते. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळींवर त्याचे अनेक दाखले आपल्याला देता येतात. असे असले तरी आजही रूढीवादी धारणा समाजात मोठ्या प्रमाणात टिकून आहेत. सुशिक्षितांची–उच्चशिक्षितांची मने अनेक प्रकारच्या अंधश्रद्धांनी कमालीची ग्रासलेली आहेत. त्यातूनच आजही ‘लैंगिकता’, ‘लैंगिक शिक्षण’ यांकडे समाजातील मोठा वर्ग दुर्लक्ष करतो. हे विषय सार्वजनिक चर्चाविश्वाचा भाग झाले पाहिजेत; परंतु अजूनही तसे होताना दिसून येत नाहीत. आजघडीलाही हे विषय समाजात उघडपणे बोलू नयेत अशाप्रकारे वर्ज्य ठरतात. या विषयावर बोलणे, लिहिणे हे शिष्टसंमत नाही; अशी मान्यता वर्तमानकाळातही कायम आहे. एकीकडे असे बुरसटलेले आणि रूढीग्रस्त वातावरण तर दुसरीकडे प्रसारण आणि संप्रेषण (communication) क्रांतीमुळे लैंगिकता हा विषय अनपेक्षितरीत्या सर्वांपुढे सतत उभा राहातो आहे. परंतु लैंगिकता आणि लैंगिक शिक्षण या विषयाचे विज्ञानाधारित ज्ञानाच्या अभावामुळे अनेकांची कुचंबणा होते; अनेक जण विकृतींनासुद्धा बळी पडतात. त्यामुळेच अनेक आजारांचे भयंकर प्रमाण आणि हिंसेचे विदारक वास्तव समाजात सर्वत्र आढळून येते.




असे असले तरी भारतीय समाजातच दुसऱ्या एका प्रवाहात इतिहासकाळापासून याबाबत अतिशय योग्य पद्धतीने ज्ञान व माहिती देणारी परंपराही राहिली आहे. खजुराहो, कोणार्क येथील शिल्पे त्याची साक्ष देतात. आधुनिक काळात यांसदर्भात र.धों. कर्वे आदींनी केलेले कार्य मौलिक आहे. महात्मा फुले यांना तर एक अखंड लिहून हे सांगावे लागले की, शरीराची नियमित स्वच्छता ठेवा, अंघोळ करा इत्यादी. भारतीय समाजातील प्रागतिक विचार परंपरेतील समाजसुधारकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकशीलता विकसित करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. प्रसंगी अनेकांनी त्यासाठी कौटुंबिक, सामाजिक आणि न्यायालयीन संघर्षदेखील केले आहेत. काही काळापूर्वी शाळांमध्ये लैंगिक शिक्षण द्यावे की देऊ नये याबाबत झालेला महाराष्ट्रातील वाददेखील या संदर्भात उदाहरण म्हणून बघता येईल. या सर्व पार्श्वभूमीवर विचार करताना डॉ. माधुरी झाडे यांची ‘वयात येताना...स्वतःला जाणूया!’ ही पुस्तिका महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह ठरते.

डॉ. माधुरी झाडे या वर्धा येथील डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क या ठिकाणी सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ‘माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक यांचा लैंगिक शिक्षणासंदर्भातील दृष्टिकोन : एक समाजशास्त्रीय संशोधन’ या विषयावर त्यांनी संशोधन करून समाजशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त केली आहे. महाविद्यालयीन जीवनापासूनच सामाजिक चळवळींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यात महत्त्वाची भूमिका पार पडणाऱ्या त्या एक कार्यकर्त्या आहेत. त्या ज्या विषयाच्या अनुषंगाने अकादमिक आणि सामाजिक जीवनात दोन दशकांपेक्षा अधिक काळ कार्यरत आहेत. त्या लैंगिक

शिक्षणासंदर्भातील त्यांची ही पुस्तिका आहे. म्हणूनच ही पुस्तिका सामाजिक अनुभवाधारित असल्याने अधिक महत्त्वपूर्ण आणि विश्वसनीय ठरते.

ही पुस्तिका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीद्वारा 'विवेक जागर प्रकाशना'कडून प्रकाशित करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनात विकसित झालेली आणि सातत्याने समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी संघर्ष करणारी, कृतिशील चळवळ आहे. चळवळीद्वारे आजवर अनेक प्रबोधनपर पुस्तिका प्रकाशित करण्यात आलेल्या असून त्याच मालिकेतील ही पुढील एक महत्त्वाची अशी पुस्तिका आहे.

या पुस्तिकेमध्ये एकूण नऊ प्रकरणे असून त्यामध्ये मुलगा आणि मुलगी यांच्या किशोरावस्था, त्यातील बदल, इंद्रियांची रचना व कार्य, गरोदरपणा, जबाबदार लैंगिक वर्तन यांसारख्या विषयांसह प्रेम, आकर्षण, प्रेमातील नकार आणि नकाराचा स्वीकार या विषयांवरही समुपदेशनाच्या पातळीवर संवादपूर्ण लेखन समाविष्ट आहे. वाढत्या वयात शरीरात होणारे बदल, त्यामागील शरीरविज्ञान लेखिकेने मुद्देसूदपणे मांडले आहे. वाढत्या वयातील शारीरिक आणि भावनिक बदलांना समजून घेण्यासाठी, त्यांचा सकारात्मकतेने स्वीकार करण्यासाठीची वैज्ञानिक समज ही पुस्तिका देते. बऱ्याचदा पालकांना वयात येणाऱ्या पाल्यांशी संवाद साधताना अडचणी येतात, संकोचही वाटतो. पाल्यांना तार्किकदृष्ट्या समजून घेणे कठीण होते. अशावेळी या पुस्तिकेतील मांडणी अशा पालकांच्या मदतीला येते.

मासिक पाळीविषयी केलेली सविस्तर मांडणी महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये लेखिकेने मासिक पाळीबाबत समाजात प्रचलित असणाऱ्या गैरसमजुतींची चिकित्सा करून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. या ठिकाणी मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी आणि याविषयीची महत्त्वपूर्ण आरोग्यविषयक माहिती मिळते. पुरुष प्रजनन इंद्रियांची रचना व कार्यपद्धतीविषयी लेखिकेने शरीररचनाशास्त्राच्या आधारे केलेली मांडणी पुरुषांना स्वत:ला पुरुषी अहंकाराच्या पलीकडे जाऊन स्वत:च्या देहाला नीटपणे समजून घेण्यास मदत करते. प्रेम आणि आकर्षण याविषयी लेखिकेने काही विचार मांडले आहेत. प्रेम आणि आकर्षणाचे द्वंद्व हे केवळ किशोरवयापुरते मर्यादित नसून वाढत्या चंगळवादी संस्कृतीत ते वयोवृद्ध अवस्थेपर्यंत विस्तारले आहे. अलीकडे त्याची दृश्यमानता वाढलेली आहे. म्हणून सर्वांनीच समजून घेण्याइतके हे विवेचन महत्त्वाचे आहे. प्रेम, नकार आणि हिंसा असे एक चक्रच झाले आहे की काय अशी स्थिती समाजात दिसून येते. प्रेमातील नकारातून विशेषत: स्त्रिया व मुलींविरुद्ध घडणारी प्रत्यक्ष हिंसा भयंकर क्रूर रूप धारण करीत आहे. त्यातूनच पुरुष आणि मुलगे देखील स्वतः भावनिक आणि काही वेळेला शारीरिक व मानसिक हिंसेचे बळी ठरत आहेत. अशावेळी हे चक्र समजून घेतानाच ही पुस्तिका वाचकांना ते चक्र भेदण्याची दृष्टी देते.

या पुस्तिकेला डॉ.अर्पिता जैस्वाल-सिंगम (एम.बी.बी.एस., एम.डी., पीएच.डी. - प्रसूतीतज्ञ व स्त्री रोगतज्ञ) यांची मौलिक प्रस्तावना आहे. पुस्तिकेच्या तळपृष्ठावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या उपाध्यक्ष डॉ. रश्मी बोरीकर (एम.बी.बी.एस., डीजीओ) यांचा मार्मिक अभिप्राय आहे. सामान्य स्त्री-पुरुषांना ज्यांच्याबद्दल काही जिज्ञासा व कुतूहल असतात अशा एलजीबीटीक्यूआयए+ समुदायाबाबत माहितीची काही प्रकरणे वा विवेचन या पुस्तिकेत असते तर ही पुस्तिका अधिक परिपूर्ण होण्यास मदत झाली असती. पुढील आवृत्तीत याचा समावेश लेखिका करतील; किंवा कदाचित पुढील काळात याविषयावर स्वतंत्र लेखन लेखिका करतील अशी आशा करूया.

लैंगिकतेवरील खुल्या चर्चेने लैंगिक स्वैराचार वाढेल, अशा अनाठायी समजुतीमुळेही त्याविषयी बोलले जात नाही. मात्र लैंगिकतेचा विपर्यस्त अर्थ लावून त्यांचे उन्मादी सादरीकरण बाजारीकरणाच्या काळात वाढले आहे. मोबाईल आणि इंटरनेट क्रांतीमुळे लहानवयापासूनच व्यक्तीवर अश्लीलतेचा भडिमार सुरू आहे. त्यातच योग्य लैंगिक शिक्षणाच्या अभावामुळे कामभावनेविषयी चुकीच्या धारणांना समाज बळी पडत आहे. अनेक स्त्री-पुरुषांच्या नात्यांमधील संघर्षाला लैंगिकतेविषयीचे अज्ञान, प्रस्थापित चुकीच्या धारणा आणि अश्लीलतेचे उन्मादी, बिभत्स प्रदर्शन कारणीभूत

आहे. एकीकडे घरंदाजपणा आणि संस्कृतीविषयक आदर्शवादाचे ओझे तर दुसऱ्या बाजूला तेच ओझे ज्यात वाहून जाईल असा गावखेड्यांपासून महानगरापर्यंत अश्लीलतेचा महापूर; असे विसंगत वास्तव स्वीकारण्यास जड जाते आहे. पालक, शिक्षक आणि समाजातील अन्य संस्था या वास्तवाचा सामना करण्यासाठी पुरेशा सज्ज नाहीत. लैंगिकतेबाबत भारतीय समाजात अनेक टॅबू आहेत. त्यामुळे लैंगिक शिक्षण आणि समुपदेशनाद्वारे योग्य मार्गदर्शन करण्यात अवरुद्धता निर्माण होते. परिणामी, समाजात लैंगिक आजार, विकृती आणि अनुषंगिक नव्या अंधश्रद्धांची निर्मिती झपाट्याने होत असताना समाजात अधिक कुशलतेने विविध माध्यमांद्वारे कार्य करणे गरजेचे आहे.

त्यादृष्टीने डॉ. माधुरी झाडे यांची ही पुस्तिका अतिशय मौलिक मार्गदर्शिका ठरते. विषयाचे सुबोध विवेचन, संवादी भाषा आणि सचित्र मांडणी यांमुळे किशोर–किशोरींपासून प्रौढांपर्यंत सर्वांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. विद्यार्थी, शिक्षक, पालक, शासकीय कर्मचारी, सामाजिक संस्था, संघटना आणि एकूणच सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या, विवेकी समाजाची निर्मिती करू इच्छिणाऱ्या सर्वांनी तसेच सामान्य व्यक्तींनी देखील ही पुस्तिका अवश्य वाचावी. त्यातून समाजाचे, व्यक्तीचे लैंगिक आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकेल. लैंगिकतेविषयीच्या अपधारणा दूर होऊ शकतील.

स्त्री–पुरुष अशा लैंगिकभावाला वैज्ञानिक दृष्टिकोनातून समजून घेण्याची संस्कृती समाजात विकसित करण्यासाठी डॉ. माधुरी झाडे यांची ही पुस्तिका सहाय्यक ठरेल. अशा संस्कृतीचा विकास हाच समाजतील लैंगिक विषमता, भेदभाव यांच्या निर्मूलनासाठी चाललेल्या कार्यात निश्चितच केलेली एक विधायक वाटचाल ठरेल.

**वयात येताना : डॉ. माधुरी झाडे**

**विवेक जागर प्रकाशन, धुळे**

**पाने : ४४ । किंमत ५० रुपये**

•

## वाचक प्रतिक्रिया

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा ऑगस्टचा अंक अत्यंत वाचनीय असून संग्रही ठेवण्यासारखा आहे. डॉ. दाभोलकरांच्या संदर्भात लेख वाचून त्यांच्या कार्याची माहिती झाली. दाभोलकरांच्या संदर्भात कार्यकर्त्यांचे अनुभव कथन वाचत असताना अक्षरशः डोळ्यात अश्रू तरळत होते.

**– सुनील लोहार, इस्लामपूर**

ऑगस्ट महिन्याचा अंक खूपच आकर्षक झालेला आहे आणि साथींनी लिहिलेले लेख मस्त आहेत. इतर दिवशी वेळ मिळत नाही म्हणून आज सुटीच्या दिवशी सर्व अंक वाचून काढला. कबड्डीपटू दाभोळकर खूप छान प्रकारे मांडणी झालेली आहे. परेश शहा यांनी त्यांच्या नात्यातील पैलू तसेच काही गोष्टींची वाच्यता केलेली नाही हे शिकण्यासारखे आहे. मच्छिंद्र सरांनी पण खूप छान उदाहरणे देऊन आमच्या माहितीमध्ये भर घातलेली आहे. वर्ध्यातील कार्यकर्त्याकडील प्रसंग, राऊत सरांना हक्काने व्यवसाय थांबविणे, तसेच बिराजदार सरांनी पण चांगल्या आठवणी सांगितल्या आहेत. भिसे सरांनी समाजाची मानसिकता अधोरेखित केलेली आहे. सफरचंद नाटकाबद्दल ऐकून होतो. त्याचा अल्प परिचय उत्तम सरांनी मांडलेला आहे. खबरबात मध्ये नेहमीप्रमाणे अनिल सरांनी चांगली मांडणी केलेली आहे. अशा प्रकारे हा अंक खूपच छान झालेला आहे. संपादक मंडळाचे खूप खूप अभिनंदन!

**– संजय बारी, पुणे**

ऑगस्ट महिन्याचा अंक वाचनीय व संग्रहनिय असाच आहे. कारण याच महिन्यात संघटनेचा वर्धापन दिन व डॉ. दाभोळकरांचा खून असे दोन्ही दिवस येत असतात आणि ते साजरे करणे कार्यकर्त्यांना तेवढेच महत्वाचे वाटतात. आठवणी या प्रेरणादायी असतात. त्या नवीन कार्यकर्त्यांना बळही देत असतात. प्रिय डॉक्टर हा विनायक सावळे यांचा लेख डॉ.दाभोलकरांच्या विविध अंगांना स्पर्श करणारा होता.

**– उपेंद्र रोहनकर, गडचिरोली**

# परिवर्तनवादी विचारवंत : प्रा.हरी नरके



**डॉ. आ. ह. साळुंखे,** सातारा

विचारवंत प्रा. हरी नरके यांचे निधन ही विविध परिवर्तनवादी चळवळींना आणि ज्ञानक्षेत्राला हानी पोचवणारी कासावीस करणारी घटना आहे. आमच्या मैत्रीच्या खूप आठवणी आहेत. अगदी प्रतिकूल परिस्थितीतून आलेला एक तरुण विद्यापीठामध्ये सुवर्णपदकामागून सुवर्णपदके प्राप्त करतो, ही गौरवशाली बाब होती. कुशाग्र बुद्धिमत्ता, थक्क करून टाकणारी स्मरणशक्ती आणि अशीच अनेक वैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती.

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा समर्पणाचा वारसा घेऊन त्यांनी आयुष्यभर बहुजन समाजासाठी कार्य केले. आपली बुद्धिमत्ता आणि व्यासंग त्यांनी आपल्या पांडित्याचे प्रदर्शन करण्यासाठी नव्हे, तर सत्य मांडून वंचित, शोषित समाजाच्या हितासाठी त्यांनी वापरला. केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर भारतात आणि भारताबाहेरही त्यांनी दिलेली व्याखयाने ही त्यांची समाजाविषयीची तळमळ आणि कळकळ दाखवणारी होती. विविध पुरोगामी संघटनांना आपल्या बौद्धिक क्षमतेचे बळ देण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. त्यांचा हा वैचारिक प्रवास अनुकरणीय आहे. तो मध्येच खंडित झाला, ही घटना क्लेशकारक आहे.



**परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते, म.फुले यांच्या साहित्याचे अभ्यासक, संशोधक वक्ते, विचारवंत प्रा. हरी नरके यांचे दि. ९ ऑगस्ट २०२३ रोजी निधन झाले. परिवर्तनवादी चळवळीच्या बौद्धिक आघाडीसाठी त्यांनी अथक कार्य केले.**

महात्मा फुले यांच्या संबंधात जेव्हा एक अतिशय कुत्सित लेख प्रसिद्ध झाला होता, तेव्हा पुराव्यांचा ढीग उभा करून तीक्ष्ण युक्तिवादाद्वारे त्या लेखाच्या चिंधड्या उडवणारे लेखन त्यांनी केले होते. माझा आणि त्यांचा ऋणानुबंध निदान ३० वर्षांचा होता. आम्ही अनेक कार्यक्रम एकत्र केले. मग ते निळुभाऊ फुले यांच्याबरोबर असतील. नागनाथअण्णा नायकवडी यांच्याबरोबर असतील. इतरही अनेक व्यक्तीबरोबर कार्यक्रम झाले.

बालभारतीच्या इतिहास समितीवर आम्ही एकत्र काम केले. त्या वेळी एकत्र प्रवासही खूप केला. गुजरातमध्ये सिंधू संस्कृतीच्या काळातील लोथल बंदर आणि धौलावीरा येथील उत्खनन अशा ठिकाणी आमचा संवाद चालत असे. ईशान्य भारतात मणिपूर, मिझोराम, नागालँड, आसाम, त्रिपुरा या राज्यांचा प्रवासही आम्ही एकत्र केला.

आमचा संवाद अखंडपणे चालू होता. ते उपचारांसाठी गुजरातला गेल्यानंतर त्यांच्या प्रकृतीत खूप फरक पडल्याची आणि तेथील उपचार घेऊन पूर्णपणे बरे होऊन ते पुण्याला परत आल्याची बातमी हा आमची मैत्री, सहवास, संवाद अजून दीर्घकाळ चालेल, अशी खात्री देणारा होता. एकेकाळी तीन तीन तास न थांबता, न अडखळता बोलणारा हा माझा वक्ता मित्र नुसता शब्दांचा खेळ करत नसे, तर पुराव्यांचा डोंगर उभा करत असे. हजारो श्रोते मंत्रमुग्ध होऊन तल्लीनतेने तासन् तास शांतपणे ऐकत असत. अर्थात या अभिव्यक्तीसाठी त्यांनी प्रचंड वाचन केलेले होते. संदर्भांचा एखादा महाकोश असावा, असा त्यांच्या मस्तकात होता आणि तो अखंडपणे जिभेवर उतरत असे.

आता कुठे परिपक्वतेच्या एका उच्च बिंदूवर पोचलेले असताना हे असे काहीतरी आकस्मिकरीत्या घडले, ही गोष्ट पचवणे माझ्यासारख्याला अतिशय अवघड आहे. असंख्य आठवणींचा एक कल्लोळ मनामध्ये निर्माण झाला आहे. माझ्यापेक्षा जवळपास २० वर्षांनी लहान असलेल्या या मित्राचे असे अचानक निघून जाणे, ही ताटातूट सहन करण्याच्या पलीकडची आहे.



# सर, तुम्ही अजून हवे होतात...

**प्रा. परेश शाह,** शिंदखेडा
९४२१४६५८६४

दि. ४ ऑगस्ट २०२३ रोजी भल्या सकाळीच शेखर सोनाळकर सरांच्या दुःखद निधनाचे वृत्त कळले. विद्यार्थिदशेत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात आलो आणि चळवळ समजायला लागली तेव्हापासून सरांचा परिचय होता.

महाराष्ट्र अंनिसच्या निर्मिती आधीपासूनच सर या कार्यात होते. पण १९८९ ला स्वतंत्र काम सुरू झाले तेव्हा अगदी प्रारंभीच्या पायाभरणीत सरांचा मोलाचा सहभाग राहिला. संघटनेचे अगदी पहिले मुखपत्र 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या नावानेच चोपडा, जि. जळगाव येथून निघत असे. त्याच्या संपादक मंडळात सोनाळकर सर होते. महा. अंनिसच्या निर्मितीनंतर ते पहिले कोषाध्यक्ष किंवा खजिनदार होते. ते पेशाने सी. ए. असल्याने कदाचित त्यावेळी ही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली असावी. अगदी सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रभर जी शिबिरे होत असत त्यात फलज्योतिष शास्त्र का नाही? आणि विश्वाची निर्मिती हा विषय सोनाळकर सर आवर्जून घेत असत. अगदी सुरुवातीला म्हणजे १९८९-९०ला रावेर, जि.जळगाव येथे स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या लोकांशी स्थानिक कार्यकर्त्यांचा वाद झाला आणि आव्हान-प्रतिआव्हान अशी पेपरबाजी झाली. शेवटी आमने-सामने बसून चर्चा करण्यात यावी यासाठी एक दिवस निश्चित करण्यात आला. तेव्हा पहिल्यांदा सोनाळकर सरांचा अभ्यास आणि आवेश अनुभवला (या वैचारिक चर्चेत शेवटी समोरच्या गटाला निरुत्तर करून सपशेल माघार घ्यायला लावली हे वेगळे सांगायला नको). तेव्हापासून या कामात सक्रिय नसले तरी पाठीराखे व आधार राहिलेले सोनाळकर सर थेट अगदी दीड-दोन वर्षांपूर्वी कामाच्या वारसा हक्कांवरून संघटनेत झालेल्या मतभेदांच्या मुद्द्यावरसुद्धा ते संघटनेच्या सोबत राहिले.



सामाजिक चळवळींमध्ये देखील मतभेदाचे आणि संघटना दुभंगण्याचे प्रसंग येत असतात. अशा वेळी मध्यस्थी करून चुकीला चूक व बरोबरला बरोबर म्हणण्याची क्षमता असणारी, प्रसंगी चुकणाऱ्याचे कान उपटण्याचा अधिकार धारण करणारी माणसे विरळाच असतात. अशा माणसांचीदेखील गरज असते. सोनाळकर सर त्या तोलामोलाचे ज्येष्ठ साथी होते.जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या प्रमुख कार्यकर्त्यांत ते एक होते. राष्ट्रसेवा दल, सामाजिक कृतज्ञता निधी, छात्रभारती, महाराष्ट्र अंनिस, सानेगुरुजी कर्मभूमी स्मारक, नर्मदा बचाव आंदोलन, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन या सर्वच सामाजिक संघटनांमध्ये ते कमीअधिक प्रमाणात सक्रिय होते. तेथील कार्यकर्त्यांच्या वैचारिक शिबिरांतून सरांना व्याख्यानासाठी आवर्जून बोलविले जाई. या सर्वांसाठी सोनाळकर सर हे विचारांचा घळघळा ओघ ओतत राहाणारे थिंक टँक होते.

लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद या संविधान मूल्यांचे सर चिंतनशील भाष्यकार होते. गांधी विचारांचे गाढे अभ्यासक होते. सामाजिक सौहार्दाचे कृतिशील पुरस्कर्ते होते. उत्तम व अभ्यासू वक्ता म्हणून त्यांची देशभर ख्याती होती. विशेषतः एखाद्या विषयावर वादविवाद वा संवाद चर्चेत समोरच्या व्यक्तीच्या सर्व प्रश्न व आक्षेपांना अत्यंत समाधानकारक, पुराव्यानिशी व अभ्यासपूर्ण उत्तरे देत आपली बाजू ठामपणे, निर्भयतेने पटवून देण्यात त्यांचा हातखंडा होता. आमच्या पिढीतील अनेकांच्या

वैचारिक जडणघडणीत सरांचा महत्त्वाचा प्रभाव राहिला आहे.

'अयोध्या विवाद : एक सत्यशोधन' नावाचा एक अत्यंत अभ्यासपूर्ण संशोधन ग्रंथ सरांनी लिहिला आहे. एकूणच सामाजिक जाणिवा अत्यंत सुमार आणि उथळ झाल्याच्या आजच्या काळात समाजमाध्यमांतून अत्यंत विपर्यस्त, खोट्या, दिशाभूल करणाऱ्या, इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्या पोस्ट्सचा भडिमार आणि त्याला चिकित्सा न करता खरे मानून त्याच व्हॉट्सअप विद्यापीठात शिक्षण घेण्याच्या सद्यस्थितीच्या कालखंडात एखाद्या विषयाचा खोलवर चिकित्सक अभ्यास करून, अनेक संदर्भ व पुरावे देत अधिकारवाणीने त्यावर सर्वसामान्यांना समजेल अशी मांडणी करणाऱ्या प्रा. शेखर सोनाळकर सरांसारख्या तत्त्वचिंतक विचारवंताचे अकाली निघून जाणे दु:खद तर असतेच; पण सर्वच प्रागतिक विचारांच्या, व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळींची आणि कार्यकर्त्यांची कधीही भरून न निघणारी ती हानी असते.

शेखर सोनाळकर सरांच्या पश्चात घरी पत्नी वासंतीताई दिघे, मुलगा कबीर व सून रत्ना साबळे आहेत. मी आणि विनायक साबळे त्यांना भेटायला गेलो. वासंतीताई अतिशय अविचल, स्थिर होत्या. भेटायला आलेल्या सर्वांशी व्यवस्थित बोलत होत्या. विशेष म्हणजे घरी ताईंच्या भरपूर मैत्रिणी होत्या. विशेष म्हणजे तरुण–तरुणींचा मोठा गोतावळा होता. या वयात इतके तरुण जोडून ठेवलेले असणं ही माझ्यासाठी फारच आशादायी गोष्ट आहे. सर आणि ताई आदर्श म्हणता येईल असे सहजीवन जगले. चळवळीच्या कामातून विचारांनी एकत्र आले. विवाहबद्ध झाले. एकमेकांच्या कामाचा आदर राखत, परस्परांना कामाची मुक्त संधी आणि अवकाश देत व शक्य तेवढे पूरक होत सहजीवन व्यतीत केले. म्हणूनच जळगाव सेक्स स्कँडलसारख्या देशभर गाजलेल्या प्रकरणात वासंतीताई व त्यांचे फेडरेशन खंबीरपणे लढू शकले. आता ताईंना सरांची ती साथ–सोबत राहिली नाही. हे व्यक्तिगतही न भरून निघणारे नुकसान आहे. पण सोबतच्या कार्यकर्त्यांचा सहवास उभारी देणारा व उमेद वाढविणारा नक्कीच आहे.

●

---

**(पृष्ठ क्रमांक १२ वरुन)**

वर्ग या नव्या व्यवस्थेचं संचालन करतो. तो चालवतो आणि तुम्हाला असं वाटत असतं की, देश पुढे चाललाय. विज्ञान पुढे चाललंय. तंत्रज्ञान पुढे चाललंय. प्रचंड प्रगती होत आहे. पण दुसरं वास्तव असं आहे की, ऐंशी कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. ही विसंगतीची बोच आहे. ती आपल्या समाजातून परांगदा झालेली आहे. ती जोपर्यंत आपल्याला होत नाही तोपर्यंत कोणत्याही सामाजिक चळवळींना, संघटनांना मुक्त अवकाशामध्ये काम करता येणार नाही. तुम्ही एका रडारवर आहात. मी भाषण ठोकतोय, तुम्ही ऐकता हे सगळं रेकॉर्ड केलं जातंय. आपण विज्ञानाचे कौतुक करतो. केलं पाहिजे. सॅटेलाईटचं कौतुक करतो. केलं पाहिजे. तो सॅटेलाइट आपल्यावर कोणती बंधनं घालायची याची माहिती पुरवत असतो, हे लक्षात घ्या. मी हे सगळं तुमच्याशी का बोलतो हे लक्षात घ्या. आपण प्रामाणिकपणे काम करणारे लोक आहोत. विविध प्रकारची कामं करतो. विश्वासाने काम करतो. प्रसंगी झळ सोसून काम करतो. पण बऱ्याचदा सतत काम करताना कामात अपेक्षित यश येत नाही, याच्या चर्चेमध्ये आपण गुंतलेले असतो. अशा वेळेला परिस्थितीचे संदर्भ आपल्या नीट ध्यानात आलेले नसतात. ते संदर्भ लक्षात आले, तर आपलं काम अधिक सुखकर होईल असं मला वाटतं. परिस्थितीचे अचूक वाचन व आकलन हे कार्यकर्त्यांसाठी आवश्यक असते. याची अचूकता असेल तर आपण कोणत्या राजकीय – सामाजिक, सांस्कृतिक अवकाशात आहोत हे समजते. मग आपली धोरणे तात्कालिक आणि दूरगामी, कार्यपद्धती ठरवणे सोपे जाते म्हणून आजूबाजूच्या परिस्थितीवर सतत नजर हवी.

आपल्या कार्याला मी हार्दिक शुभेच्छा देतो. आपणा सर्वांचे मनापासून आभार.

**(लेखक राजकीय, सामाजिक विषयांचे अभ्यासक व ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

●



# निबंध स्पर्धा आणि माझा अंनिसमधील प्रवेश

**प्रकाश कांबळे,** वर्धा
९४२३११८७३०

स्वावलंबी विद्यालय, वर्धा येथे सहाय्यक शिक्षक म्हणून नोकरीत रुजू झालो. उपजीविकेची चिंता जवळजवळ मिटली होती. नोकरीतील कर्तव्य व्यवस्थित, प्रामाणिकपणे पार पाडल्यानंतर काही सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अशा चळवळीत आपला वेळ, श्रम आणि पैसा यांचा आपल्या कुवतीनुसार विनियोग करावा असे अगोदर मनात होतेच; ते आता प्रत्यक्ष आचरणात आणण्याची संधी आली होती. मी वर्ध्यातील काही चळवळीत सहभागी होऊ लागलो. अशातच सन २००३ - २००४ च्या सुमारास महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेची जाहिरात वाचली. 'स्त्रिया आणि अंधश्रद्धा : स्वरूप, कारणे आणि उपाय' हा निबंध स्पर्धेचा विषय होता; तो समजून घेण्याचा, त्याच्या व्याप्तीचे आकलन करण्याचा प्रयत्न केला. आपण लिहू शकतो काय? आणि त्यासाठी काय पूर्वतयारी करावी लागेल? विषयाचे मुद्दे, त्यांची मांडणी यावर चिंतन करताना एक आत्मविश्वास निर्माण झाला की एक चांगला लेख लिहिणे आपल्याला शक्य आहे. हाच आत्मविश्वास उराशी बाळगून लिहायला सुरुवात केली आणि दिलेल्या मुदतीत सांगली येथील दिलेल्या पत्त्यावर पाठवून दिला. दररोजच्या कामात लागल्यानंतर विसरूनही गेलो.

एक दिवस मला अंनिसकडून पत्र आले. पत्र वाचताच मला प्रचंड आनंद झाला. कारण माझ्या निबंधाची राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाच्या बक्षिसासाठी निवड झाली होती. मी घरी आईबाबांना सांगितले; त्यांनाही खूप आनंद झाला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ लातूर येथे आयोजित 'अंधश्रद्धा निर्मूलन: महिला जाहीरनामा परिषदे'त होणार होता. या कार्यक्रमात प्रसिद्ध सिनेअभिनेते तथा पुरोगामी विचारवंत डॉ.श्रीराम लागू, निळूभाऊ फुले, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक व राज्य कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर, आपले वर्तमान राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे असे काही मान्यवर उपस्थित राहाणार होते. पण मला त्यावेळी काही कारणांमुळे हा संस्मणीय क्षण अनुभवता आला नाही, याची हळहळ आजही मनात आहे. त्यावेळी माझा पुरस्कार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती वर्धाचे क्रियाशील कार्यकर्ते गजेंद्र सुरकार जे आज आपले राज्य प्रधानसचिव म्हणून पूर्णवेळ कार्यरत आहेत, यांनी माझ्या वतीने स्वीकारला होता. आणि मी तेव्हापासून हळूहळू या चळवळीकडे वळलो.

सुरुवातीला सदस्य म्हणून कार्यक्रम, बैठका, उपक्रम यामध्ये उपस्थित राहू लागलो. बरेचदा चमत्काराचे प्रयोग गजेंद्र सुरकार करून दाखवायचे. ते नीट बघणे, समजून घेऊन ते प्रयोग स्वतः करून पाहाणे, कधी कार्यक्रमात



सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन करणे अशा जबाबदाऱ्या पार पाडू लागलो. एकदा २००५ मध्ये नागपूर येथील विनोबा विचार केंद्रामध्ये कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर होते. त्या शिबिरामध्ये डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्याशी परिचय झाला. येथे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे व्याख्यान ऐकले आणि मग माझा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मधील सक्रिय सहभाग वाढत गेला. २०१५ पासून सहा वर्षे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली. जिल्हा कार्याध्यक्ष असताना वर्धा जिल्ह्यातील शाखांना भेटी देणे,

निर्भय मॉर्निंग वॉक, जवाब दो आंदोलन असे कार्यक्रम आणि उपक्रम केले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासाबाबत स्थानिक आमदार मा. डॉ. पंकज भोयर, खासदार मा. रामदास तडस, तत्कालीन विधान परिषदेचे सदस्य मा. प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या निवासस्थानी जाऊन निवेदने दिलीत. त्यांच्याशी महाराष्ट्र अंनिसची भूमिका आणि कार्य याबाबत चर्चाही झाल्या. स्वयंअध्ययन परीक्षा उपक्रम राबविणे, विज्ञान बोध वाहिनीच्या फिरत्या तारांगणाचे कार्यक्रम लावणे, त्रिदशक पूर्ती कार्यक्रमासाठी निधी संकलन करणे असे विविध उपक्रम यशस्वी केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ वर्धा जिल्हा शाखेने २१ मार्च २०१६ पासून आजपर्यंत 'कृतिशील वैचारिक आदरांजली' म्हणून महिन्यातून दोन अभ्यास वर्गांचे यशस्वी आयोजन केले आहे. आज आम्ही १५१ अभ्यास वर्ग घेण्यात यशस्वी ठरलो.

सध्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग, राज्य सहकार्यवाह म्हणून कुटुंब, नोकरी इत्यादी सांभाळून जमेल तसा क्रियाशील राहाण्याचा प्रयत्न करतो आहे. आज या चळवळीमध्ये मला १८ वर्षे झाली. सन २०२३-२४ या कालावधीसाठी ज्यांची जिल्हा कार्याध्यक्ष आणि जिल्हा प्रधानसचिव पदी नियुक्ती झाली आहे. ते सर्व कार्यकर्ते प्रशिक्षित व्हावे या हेतूने वर्धा येथे दिनांक ६ व ७ मे २०२३ रोजी जगजीवनराम विद्यालय, वर्धा येथे 'संघटना बांधणी निर्धार प्रशिक्षण शिबिर' आयोजित करण्यात आले होते. ज्यांनी सतत डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्यासोबत राहून चळवळीत काम केले आहे ते आपले वर्तमान राज्य कार्याध्यक्ष लातूरचे माधव बावगे सर या शिबिराला मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शिबिराच्या समाप्तीनंतर रविवार, दिनांक ७ मे २०२३ ला सायंकाळी आठ वाजता माधव बावगे, राज्य सरचिटणीस विनायक सावळे, बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण, सुयश तोषणीवाल इत्यादी कार्यकर्ते माझ्या घरी आले. माझ्या कुटुंबीयांनी त्यांचे स्वागत केले, सर्वांशी गप्पा आणि चर्चा झाल्या. जेवण झाल्यानंतर मी माधव बावगे सरांना २००३ सालच्या निबंध स्पर्धेत मला मिळालेल्या बक्षिसाची आठवण करून दिली आणि पुन्हा एकदा बक्षिसाचा तो मेमेंटो शो केस मधून काढला. एक आठवण म्हणून त्या मेमेंटोसह आम्ही सर्वांनी फोटो घेतला. हा क्षण माझ्यासाठी तोच २० वर्षांपूर्वीचा आनंद देणारा ठरला. मी त्यावेळी हा पुरस्कार ज्या वर उल्लेखित मान्यवरांच्या उपस्थितीत घेणार होतो तोच आभासी प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. त्याचवेळी माधव बावगे सरांच्याच हस्ते जणू काही मी हे बक्षीस स्वीकारले अशा प्रसंगाचा तो आनंद आज मी पुन्हा मनस्वी लुटला. चळवळीला कार्यकर्ते भाषण, व्याख्यान किंवा इतर कार्यक्रमांतून मिळतात, त्याचप्रमाणे अशा लोकाभिमुख स्पर्धांच्या माध्यमातून माझ्यासारखे कार्यकर्ते स्वतःच येऊन मिळतात हे या ठिकाणी मला अधोरेखित करावेसे वाटते.

**(लेखक महा.अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह आहेत.)**

●

## खबरबात




**चोपडा (जळगाव)** : शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमीत्त चोपडा येथे निर्भय मार्निंग वॉक व अभिवादन सभा यावेळी डॉ. अय्युब. आर. पिंजारी, डॉ. विकास हरताळकर, कॉ. अम्रुत महाजन, सलीम पिंजारी, संतोष अहिरे, आफताब पिंजारी, गुरुदास मोरे, समाधान कोळी, मानस कोळी, गुलाबशहाँ बुर्हानशहाँ, कलंदरअली उमरअली, दिगंबर पाटील, छोटु पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत,** पालघर
९८२३२८०३२७

**वयात येताना (लैंगिकता प्रबोधन)**

**रबाळे (नवी मुंबई):** छत्रपती शाहू महाराज विद्यालय रबाळे, या शाळेत १९ जुलै रोजी विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी 'वयात येताना' ही व्हिडिओ चित्रफित दाखवण्यात आली. 'चमत्कारामागील विज्ञान' या कार्यक्रमाचे सादरीकरण प्रा मच्छिंद्र मुंडे यांनी केले. एकूण ३ सत्रात मिळून ७वी ते १०वी च्या १०५० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**वर्धा:** २२/७/२०२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी विद्यालय, प्रताप नगर वर्धा येथे ' वयात येताना ' या उपक्रमाअंतर्गत ९ वी व १० वी च्या मुलींना मार्गदर्शन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौ. मंजुषा देशमुख उपस्थित होत्या.

**कोल्हापूर:** वयात येताना-लैंगिकता प्रबोधन या उपक्रमाअंतर्गत विद्यामंदिर हिरवडे खालसा, ता. करवीर येथे ६ वी आणि ७ वी च्या विद्यार्थ्यांशी महा. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी संवाद साधला. यावेळी जिल्हा युवा कार्यवाह प्रतिज्ञा यांनी 'वयात येणं म्हणजे काय? वयात येताना होणारे बदल आणि स्त्री जनन अंगांचे बाह्य अवयव' यावर माहिती करुन दिली. कृष्णात स्वाती यांनी 'स्त्री जनन संस्थेचे आंतर अवयव, त्यांचे कार्य आणि मासिक पाळी, यामुळे मुलींवरील बंधने आणि अंधश्रद्धा' यावर माहिती दिली. राहुल यांनी 'मुलगा वयात येताना होणारे बदल, पुरुषांची बाह्य आणि आंतर जनन इंद्रिये आणि त्यांचे कार्य' याची माहिती दिली. भास्कर यांनी 'लहान मुलांना आपण खेळणी गिफ्ट देताना कसा भेदभाव करतो आणि त्यांचा लिंगभाव तयार करतो हे सांगितले

**शहादा:** शाखेच्या वतीने उमलत्या वयातील जाण आणि भानया विषयाअंतर्गत शारदा कन्या या माध्यमिक उच्च माध्यमिक शाळेत दीडशे मुलींना या विषयाची माहिती देण्यात आली.

**महाराष्ट्र अंनिस स्थापना दिवस**

**शहादा (नंदुरबार):** शाखेच्या वतीने स्थापना दिवस साजरा करण्यात आला. राज्य सरचिटणीस विनायक सावळे, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, शहादा शाखेचे कार्याध्यक्ष संतोष महाजन प्रधान सचिव श्रीकांत बाविस्कर, इतर समविचारी संस्था, संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**लासूर:** शाखेमध्ये दि.९ ऑगस्ट २०२३ रोजी समितीचा ३४ वा स्थापना दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या जीवनावर आधारित प्रसंग उद्धृत केले.

**वाशीम:** डॉ. सुप्रिया नायर यांनी मन व मनाचे आजार व त्या संदर्भातील अंधश्रद्धा या विषयावर मार्गदर्शन केले. कार्याध्यक्ष पी एस खंदारे यांनी प्रात्यक्षिकासह चमत्कार सादरीकरण करून जादूटोणाविरोधी कायद्यामधील विविध तरतुदींवर प्रकाश टाकला. यावेळी सरस्वती समाजकार्य महाविद्यालय व रामराव झनक समाजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**चंद्रपूर:** ९ ऑगस्ट रोजी ऊर्जानगर येथे कार्यकर्ता कुटुंब मेळाव्यात पी एम जाधव यांचा चमत्कार सादरीकरण कार्यक्रम, अनिप मासिकाचे प्रकाशन, राजुरा येथील स्काउट-गाइड शिक्षक प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन, करून साजरा करण्यात आला.



**वर्धा:** वर्धा जिल्हा प्रधान सचिव सुनील ढाले, सहचारिणी हरिकाताई ढाले यांचे हस्ते बुद्ध टेकडीवर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागचे राज्य सहकार्यवाह प्रकाश कांबळे यांनी

समितीबद्दलची माहिती दिली. याप्रसंगी कार्यकर्ते उपस्थित होते.

**ऊर्जानगर:** कामगार मनोरंजन केंद्र ऊर्जानगर येथे दि.०९ ऑगस्ट २०२३ ला अंनिस परिवाराचा मेळावा संपन्न झाला. पी एम जाधव यांनी अंनिसच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. अंधश्रद्धा निर्मूलनावर विविध प्रयोग सादरीकरण करून त्याचे विश्लेषण देण्यात आले.

**देवळी:** एस एस एन जे महाविद्यालय देवळी जिल्हा वर्धा येथे अंधश्रद्धा निर्मूलन व चमत्कार सादरीकरण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ ढाले, प्रा संतोष मोहदरे, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

**घणसोली:** शाखेने अंनिसमधील कार्यकर्त्यांचे 'स्वानुभव कथन' हा कार्यक्रम आयोजित केला. गजानंद जाधव, निरंजन थोरात, नाना खैरमोडे, जयराम थोरात, शुक्राचार्य खैरमोडे व अशोक निकम यांनी स्वानुभव कथन केले.

**नवी मुंबई:** जिल्हाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, रबाळे मध्ये वृक्षारोपण केले.

**गडचिरोली:** आदिवासी शासकीय मुलांचे वसतिगृह आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती गडचिरोलीचे संयुक्त विद्यमाने जागतिक आदिवासी गौरव दिन आणि समितीचा वर्धापन दिन शासकीय आदिवासी मुलांचे वसतीगृहात साजरा करण्यात आला.

**मुंबई:** मुंबई जिल्ह्याने कर्जत येथील प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या साने गुरूजी ट्रस्टच्या फार्म हाऊसवर वर्धापन दिन साजरा केला.

**नागपूर:** राजभवन समोरील अंजुमन कॉलेज, सदर चौकात वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संजय शेंडे यांनी समितीच्या कार्याची व अंधश्रध्दा निर्मूलनाची फलनिष्पनती विशद केली. जगजितसिंग व मधुकर धदरे यांनी जादुटोणा विरोधी कायदा, जात पंचायत विरोधी कायदा यांची माहिती दिली. कोल्हापूर:- कोथळी, ता. करवीर येथील शालेय विद्यार्थ्यांशी 'श्रद्धा - अंधश्रद्धा' या विषयावर संवाद साधत संघटनेचा वर्धापन दिन साजरा केला. यावेळी अंधश्रद्धेवरील गाणी घेण्यात आली चमत्काराचे सादरीकरणही करण्यात आले. विद्यार्थ्यांनी 'हर घर संविधान' या पथनाट्याच्या भागाचे सादरीकरण केले. ३ री ते ९ वी मधिल एकुण ४० विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

**निमगुळ:** कष्टकरी शेतकरी, मजूर निमगुळ यांना अंनिस चा जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा बद्दल माहिती दिली.

**जिल्हा मेळावा**

सोलापूर जिल्हा प्रेरणा मेळावा मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन डॉ. नंदकुमार पवार यांनी केले. देशातील गरिबीच्या कारणांपैकी सर्वात मोठे कारण अंधश्रद्धा आहे असे प्रतिपादन डॉ. पवार यांनी केले. डॉ. गोविंद पाटील म्हणाले की अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यामध्ये युवक आणि महिलांचा समावेश करणे गरजेचे आहे. प्रबोधन सत्रात, 'अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ व आपली भूमिका' या विषयावर बोलताना डॉ.अरुण शिंदे म्हणाले, जगभर मूलतत्त्ववादाचा प्रभाव वाढतो आहे. भारतीय राज्यघटनेच्या आधाराने आपणाला धर्म संस्था, राज्यसंस्था, शिक्षण संस्था, संस्कृती, भाषा संस्था यांना चिकित्साच्या केंद्री आणणे गरजेचे आहे. सुधाकर काशीद, धर्मराज चवरे यांनी चमत्कार प्रशिक्षण दिले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष डॉ.अतुल निकम, कार्याध्यक्ष डॉ. दत्ता सरगर, दिलीप जाधव, गणेश यादव, अर्चना सलगर, संभाजी सलगर, प्रकाश मुळीक, औदुंबर ढावरे यांनी परिश्रम घेतले.



**कोल्हापूर:** दि. ७/८/२०२३ रोजी अंनिस जिल्हा बैठक कोल्हापूर येथे जिल्हा अध्यक्ष डॉ. हिर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ३० जण उपस्थित होते. या मिटिंगमध्ये जूनपासून पुढे झालेल्या उपक्रमांचा विभागवार आढावा घेण्यात आला. यानंतर पुढील महिन्यामध्ये प्रस्तावित उपक्रम यांबद्दलचे नियोजन करण्यात आले.

**चमत्कार सादरीकरण प्रशिक्षण**

**शहादा:** २३ जूलै रोजी चमत्कार सादरीकरण व त्यामागील विज्ञान प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणामध्ये १५ कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी विनायक सावळे, रवींद्र पाटील व प्रदीप केदारे यांनी चमत्कार सादरीकरणाच प्रशिक्षण दिलं.

**नागपूर:** शाखेच्या वतीने २३ जुलै रोजी सेवादल महिला महाविद्यालय मध्ये पार पडले. गजेन्द्र सुरकार यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चमत्कारी प्रयोगाचे महत्व, सादरीकरण व प्रात्याक्षिक याबाबत घ्यावयाची काळजी, दक्षता समजावून सांगितले. चमत्कारामागील विज्ञानाची भूमिका, आधुनिक बुवाबाजी तसेच चमत्कारांचे प्रात्यक्षिक सादरीकरणातील संभाव्य धोके या विषयावर तज्ञ प्रशिक्षक मधुकराव धंदरे यांच्या सोबतीला गौरव आळणे यांनी साथ दिली. अनेक प्रयोग करून त्याचे कौशल्यविज्ञान व प्रयोग कसे सादर करावे हे प्रशिक्षणार्थींना सांगितले.

**अमरावती:** चमत्कार प्रशिक्षण कार्यशाळा दि. १६ जुलै २०२३ ला मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथे संपन्न झाली. पस्तिस प्रशिक्षणार्थींनी चमत्कार व त्यामागील विज्ञान जाणून घेतले.



**जालना:** नागसेन वाचनालय, जालना येथे संवाद-प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. डॉ. बसवराज कोरे यांनी देवा धर्माच्या नावाने शोषण कसे होत असते यावर प्रकाश टाकला. महाराष्ट्र अंनिसची पंचसूत्री व अंनिसची व्यापक वैचारिक भूमिका याबाबत राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी मांडणी केली. प्रात्यक्षिकांचे सादरीकरण राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी करून दाखविले. सर्पविज्ञान आणि सर्पाबद्दलच्या अंधश्रद्धा यावर रंगनाथ थोरात यांनी मार्गदर्शन केले. व्यसनमुक्ती या विषयावर लक्ष्मी नारायण आखात यांनी संवाद साधला.

**मणिपूर येथील अमानुष अत्याचाराच्या विरोधात निषेध आंदोलन**

**मंगळवेढा**: मणिपूर घटनेबाबत निषेध नोंदविण्यासाठी मंगळवेढा येथे निषेध सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष डॉ. अतुल निकम म्हणाले की आजचा समाज आधुनिक प्रचार प्रसार माध्यमांच्या साह्याने प्राचीन काळात असल्यासारखा जातीजातीच्या गटात विभागला आहे. माणूस म्हणून आपण समूहाने राहणं हेच पुढील अन्याय रोखण्याचे एकमेव साधन आहे. यावेळी डॉ. आरती भिंगे, डॉ. रोहिणी पवार, पांडुरंग जावळे यांनी आपले मत व्यक्त केले.

**शहादा:** दिनांक २२ जूलै रोजी शहादा शाखेच्या वतीने मणिपूर या राज्यांमध्ये महिलांवर झालेला अमानुष अत्याचार याच्या विरोधात निषेध नोंदवण्यासाठी सर्व समविचारी संस्था संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

**पालघर:** दि.१ ऑगस्ट रोजी निषेध आंदोलन मोर्चा करण्यात आले. सदर आंदोलनात पालघर जिल्यातील बहुसंख्य आंदोलक सहभागी झाले होते.

**नागपूर:** उत्तर शाखा नागपूर तर्फे मणिपूर महिलांच्या अत्याचाराच्या निषेधार्थ नारे-निदर्शने व घोषणा देण्याच्या उपक्रम राबविला गेला. बाबासाहेब आंबेडकर मिशन, आवळे बाबू चौक, लष्करीबाग, नागपूर येथे कार्यकर्ते उपस्थित होते.

**पनवेल:** २५ जुलै रोजी वाशी नवी मुंबई येथे मणिपूर हिंसाचाराचा निषेध करण्यासाठी सर्व संघटना मिळून आंदोलन झाले. त्यात पनवेल शाखेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सक्रिय सहभागी झाले होते २६ जुलै रोजी पनवेल मधील शिवाजी चौकात निषेध आंदोलन झाले.



राष्ट्रपतींच्या नावे तहसीलदाराना शाखेतर्फे निवेदन देण्यात आले.

**नवी मुंबई:** मणिपूरमधील महिलांवर अत्याचार केलेल्या व्यक्तींवर तत्काळ कारवाई करावी असे निवेदन २४ जुलै, २०२३ रोजी, विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे देण्यात आले.




**जामनेर:** मणिपूरमधील महिलांवर अत्याचार केलेल्या व्यक्तींवर तात्काळ कारवाई करावी असे निवेदन मा. तहसीलदार यांना देण्यात आले.

**नाशिक:** अंनिसतर्फे नाशिकमध्ये अत्याचाराचा निषेध करण्यात आला.



**मुंबई:** जिल्हा शाखेच्या वतीने मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी:**

**जामनेर:** जामनेर शाखेतर्फे १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी रामदास सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या कार्याबाबत मार्गदर्शन केले.

**चंद्रपूर:** अण्णाभाऊ साठे यांच्या पुस्तकांची प्रदर्शनी आयोजित करण्यात आली.

**लासूर:** शाखेतर्फे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. उपस्थित सदस्यांनी आण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित प्रसंग स्पष्ट केले.

**भंडारा:** शाखेच्या वतीने अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.



**पावसाळी ट्रेक:** पनवेल शाखेतर्फे पावसाळी ट्रेक १६ जुलै रोजी कोथळीगड पेठ येथे आयोजित केला होता. एकूण त्रेचाळीस कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**जादुटोणा विरोधी कायदा प्रशिक्षण:** वर्धा जिल्हाच्या पुढाकाराने सेलू पोलिस स्टेशन येथे पोलिस पाटील यांच्या जादुटोणा विरोधी कायदा प्रशिक्षण कार्यशाळ  आयोजित करण्यात आली.

**मानस मैत्र प्रशिक्षण शिबिर:** खारघर येथील अरविंद सोनटक्के यांच्या ट्रेनिंग सेंटर मध्ये २२ व २३ जुलै रोजी ट्रेनिंग पार पडले. पनवेल, खोपोली, मुंबई येथील कार्यकर्त्यांनी यात सहभाग घेतला.

**जटा निर्मूलन**

**कुरळप (सागंली) :** संजय बनसोडे, प्रा. डॉ. सुदाम माने, प्रा. बी. आर. जाधव, अजय भालकर यांनी एका वृध्द महिलेचे जटानिर्मूलन केले.

**बालविवाह रोखला**

**इस्लामपूर(सागंली) :** शाखेच्या वतीने नुकताच एक बालविवाह रोखण्यास यश मिळवले. याकामी इस्लामपूर आणि आष्टा पोलिस ठाण्याचे अधिकारी तसेच वाळवा तहसीलदार यांची सहकार्य मिळाले. संजय बनसोडे, प्रा. सतीश चौगुले यांनी विशेष प्रयत्न केले.

•

## स्मृतिजागर आणि अभिवादन

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येला दहा वर्षे पूर्ण होऊनही खून करणाऱ्यांना शिक्षा झालेली नाही. हत्येच्या सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याबाबत तपास यंत्रणांची अनास्था आणि राजकीय इच्छाशक्तीचा पूर्ण अभाव या विरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे विविध मार्गांनी पुणे येथे तीव्र असंतोष व्यक्त करण्यात आला. डॉ. दाभोलकर यांची ज्या महर्षि विठ्ठल रामजी शिंदे पुलावर हत्या झाली तेथे १९ ऑगस्ट रोजी दहाव्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला कार्यकर्त्यांनी स्मृतिजागर आणि अभिवादन केले. या प्रसंगी महा. अंनिसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिवादन गीते, घोषणा आणि मान्यवरांची भाषणे याद्वारे स्मृतिजागर करत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येच्या तपासाच्या बाबतीत स्पष्ट दिसत असलेल्या अनास्थेचा उपस्थितांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

सामाजिक कार्यकर्ते आणि पुणे जिल्हा महा. अंनिसचे अध्यक्ष मानव कांबळे यांनी सरकारवर घणाघाती हल्ला करतांना डॉ. दाभोलकर यांच्या हत्येला साडेतीन हजार दिवस होऊन गेले असताना आणि कार्यकर्ते शांततामय मार्गाने न्यायासाठी आंदोलन करत असताना सूत्रधारांपर्यन्त अजून सरकार पोहोचू शकले नाही हे निदर्शनास आणून, सरकार अजून कार्यकर्त्यांचा किती अंत पाहणार? असा प्रश्न सरकारला केला. राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी सरकारला दाभोलकरांच्या खुनाच्या तपासाचे गांभीर्यच नसल्याचा आणि खुनाचे सूत्रधार माहीत असूनही सरकार कारवाई करत नसल्याचा आरोप केला. प्रसिद्ध विचारवंत आनंद करंदीकर आणि राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांनीही अभिवादनपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य प्रधान सचिव ठकसेन गोराणे यांनी, तर सूत्रसंचालन विशाल विमल यांनी केले. अभिवादन गीते अनिल करवीर, परिक्रमा खोत, माधुरी गायकवाड, राहुल उजागरे, अनिल दरेकर, स्वप्नील मानव यांनी सादर केली. या प्रसंगी मेणबत्त्या आणि मशाल पेटवून कार्यकर्त्यांनी डॉ. दाभोलकर यांना अभिवादन केले.

**मूक मोर्चा :** २० ऑगस्ट रोजी महर्षि विठ्ठल रामजी शिंदे पुलावर डॉ. दाभोलकर यांना अभिवादन करून मूक मोर्चा काढला. डॉ. दाभोलकर यांच्या जाण्याची वेदना आणि तपासाबाबत सरकारी अनास्थेचा निषेध काळे वस्त्र परिधान करून कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. हा मूक मोर्चा एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनपर्यंत अत्यंत शिस्तीत काढण्यात आला.

**निर्धार मेळावा :** मूक मोर्चानंतर एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनच्या सभागृहात निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हे संपूर्ण सभागृह कार्यकर्त्यांनी तुडुंब भरले होते. या निर्धार मेळाव्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि आपल्या चळवळीचे मार्गदर्शक, विचारवंत डॉ. बाबा आढाव, प्रसिद्ध विचारवंत डॉ. राम पुनियानी, ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई, सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल, कार्याध्यक्ष माधव बावगे, प्रधान सचिव संजय बनसोडे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महा. अंनिसचे अध्यक्ष अविनाश पाटील होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल विमल यांनी तर आभार श्याम येणगे यांनी केले. अनिल करवीर, विजय नांगरे आणि साथीनी चळवळीची गीते सादर केली.

सर्व मान्यवरांनी बदलत्या परिस्थितीमुळे निर्माण झालेली आव्हाने आणि त्यास कसे तोंड देता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. तपासात झालेली दिरंगाई, सूत्रधारांपासून कटाक्षाने दूर राहिलेल्या तपास यंत्रणा याचा सर्वांनी निषेध केला. बाबा आढाव यांनी चळवळ ग्रामीण भागात घेऊन जाण्यासाठी ग्रामीण जनतेला भावणारी भाषा वापरावी असा सल्ला दिला. राम पुनियानी यांनी आपल्या संवादी आणि चिमटे काढणाऱ्या शैलीत वर्तमान परिस्थितीचे विश्लेषण केले आणि यातून कसा मार्ग काढला जाऊ शकतो यावर मार्गदर्शन केले. धर्म कधी धोक्यात येत नसतो, तर काही लोकांचे हीत धोक्यात येते असे सांगून धर्माधारित राजकारण देशाचा विनाश करते असे भाष्य केले. हेमंत देसाई यांनीही राजकारणाचे वर्तमान चित्र उभे करत राजकारणात आयडियालॉजीचा अंत झाल्याचे सांगितले. रझिया पटेल यांनी भीषण वर्तमान डोळ्यासमोर उभा करून अत्यंत क्रूर असलेली राज्यसत्ता सध्या राज्य करीत आहे याची जाणीव करून दिली. माधव बावगे यांनी संघटनेच्या वाटचालीची मांडणी केली तर कार्यक्रमाचे अध्यक्ष अविनाश पाटील यांनी डॉ. दाभोलकर यांच्या हत्येनंतरसुद्धा संघटन कसे टिकून राहिले, विस्तारले याची माहिती दिली.

'हम होगे कामयाब' या गीताने निर्धार मेळावा संपन्न झाला. या दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमाचे संपूर्ण आणि नेटके नियोजन पुणे जिल्हा टीमने केले.

# गणितप्रेमी

रमेश रहाळकर

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर आणि वृत्तपत्रातदेखील गणिताचे अज्ञान प्रकट करणारी, दूषित पूर्वग्रहाची ही पोस्ट फिरताना दिसली :

**गणितात १ ते १० पर्यंतच्या सर्व संख्यांनी भाग जातो अशी एकही संख्या नाही. पण एका संख्येने जगभरातील गणितज्ज्ञांना मोठा धक्का दिला. अभिमानाची गोष्ट अशी की, ही संख्या शोधणारा विद्वान भारतीय आहे! ही संख्या आहे '२५२०'. ही साधीसुधी संख्या दिसते; पण अनेक गणितज्ज्ञ यामुळे चकित झालेत. या संख्येला १ ते १० पर्यंतच्या सर्व संख्यांनी (सम असो वा विषम) पूर्ण भाग जातो. हवं तर तुम्ही कॅल्क्युलेटर वापरून पाहा. २५२० या अद्‌भुत संख्येचे कोडे सोडवले ते भारतीय हिंदू कालगणनेने. या संख्येनेच कालगणना बनली. आठवड्यातले दिवस ७, महिन्यातले दिवस ३० आणि वर्षातले महिने १२. ७ x ३० x १२=२५२०. हेच काळाचे वैशिष्ट्य आणि प्रभुत्व आहे. ही संख्या शोधून काढलेला महान गणितज्ज्ञ आहे 'श्रीनिवास रामानुजन'!**


आता, पहिली गोष्ट म्हणजे या पोस्टमधून निव्वळ मूर्खपणाच प्रकट होतो. यातून उपस्थित केलेला प्रश्न अजिबात कठीण नाही. अगदी सहावी-सातवीतील विद्यार्थी देखील १ ते १० यातील सर्व संख्यांनी भाग जाणारी संख्या शोधू शकतो. आपण शाळेत असताना 'लसावी' (लघुत्तम सामाईक विभाज्य) शिकतो. १ ते १० संख्यांचा लसावी २५२० येतो. हे खूपच सोपे आहे. गणितज्ज्ञाला आश्चर्य वाटण्यासारखे यात काहीच नाही. त्यातही रामानुजन यांना भारतीय म्हणून श्रेय देण्यातून भारतीयत्वाचा वृथा अहंकार करणे आहे. दुसरे म्हणजे जर २५२० ला १ ते १० संख्यांनी भाग जातो, तर २५२० च्या पाढ्यातील (५०४०, ७५६०, १००८०...) अशा अनेक संख्यानांही भाग जाणारच ना! म्हणजेच २५२० ही अशी एकमेव संख्या नाही.

मला वाटलं, ज्या कोणी ही पोस्ट तयार केली त्याला हे माहीत नव्हते का? तो अगदीच मूर्ख असला पाहिजे. पण नंतर वाटलं, ही पोस्ट गणिताची नसून मानसशास्त्राची असेल का? लोक किती भोळे असतात हे त्याला दाखवून द्यायचे असावे. त्याने लसावीचा प्रश्न घेतला आणि सांगितले की, तो अतिशय कठीण आहे. गणितज्ज्ञांनाही सोडवता आला नाही. तो एका हिंदूने सोडवला असे सांगून त्याची वारेमाप स्तुती केली. लोकांनी तेवढंच बघितलं. हिंदू गणितज्ज्ञाची स्तुती बघून लगेच फॉरवर्ड केले. पण पोस्टमध्ये तथ्य आहे का हे त्यांनी बघितलंच नाही. लोकांच्या वागणुकीवर सत्य आणि ज्ञानापेक्षा पूर्वाग्रहाचा कसा पगडा पडतो हे या प्रयोगातून दिसते. आता सोडवा एक नवीन कोडे.

**कोडे क्र. १०**

शिक्षक एका कागदावर काही ठिपके काढतात. त्यानंतर विद्यार्थ्यांना किती ठिपके आहेत? असा प्रश्न विचारतात. एकजण सात तर दुसरा पाच उत्तर देतो. शिक्षक दोन्ही उत्तरे बरोबर आहेत असं म्हणतात. असं असेल तर कागदावर नक्की किती ठिपके आहेत?

**कोडे क्र. ९ चे उत्तर: ९ काड्या (त्रिमितीय आकृती)**



**कोडे क्रं. ८ व ९ चे बरोबर उत्तर देणारे गणितप्रेमी**

विजय उरकुडे (गडचिरोली)

सचिन थिटे (मुंबई)

विनोद मोरये (राधानगरी)

अशोकभाई शाह (शिंदखेडा)

सुधाकर मिसाळ (वर्धा)

●

# विवेक-विज्ञान शब्दकोडे क्र. १४

**- उत्तम जोगदंड**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | ■ | १ | २ | ■ | ३ | | ■ | ४ | ■ |
| ■ | ५ | ■ | ६ | | | ■ | ■ | ७ | |
| ८ | | | ■ | ■ | | ■ | ९ | | ■ |
| ■ | | ■ | ■ | १० | | ११ | ■ | | ■ |
| ■ | १२ | १३ | | | | | | | १४ |
| १५ | | | ■ | | ■ | | ■ | १६ | |
| ■ | ■ | | ■ | | ■ | १७ | | ■ | |
| १८ | | | ■ | | ■ | | ■ | १९ | |
| | ■ | ■ | २० | ■ | २१ | | ■ | २२ | |
| २३ | | | | | ■ | २४ | | | ■ |

**आडवे शब्द:**

१) पंजाबच्या पाच नद्यांपैकी एक नदीचे नाव

३) पृथ्वी स्वतःभोवती फिरताना या उत्तर-दक्षिण जाणाऱ्या रेषेभोवती वर फिरते

६) सागर (संस्कृत तत्सम शब्द)

७) आपल्या संतशिरोमणी यांचे संक्षिप्त नाव

८) शेतकऱ्यांचे एक औजार

९) मानवाने लावलेला क्रांतिकारक शोध यामुळे त्याला भ्रमण करणे सोपे झाले

१०) पॅलेस्टाइनमधील एक दहशतवादी संघटना

१२) २१ सप्टेंबर हा दिवस '---------' दिन म्हणून महा.अंनिसतर्फे पाळला जातो

१५) जादूटोण्याचा लोकांना भयभीत करणारा बुवाबाजीचा एक प्रकार

१६) ध्यान, लाख

१७) एक विशाल वृक्ष-प्रकार

१८) डोंगर-पर्वतांवरचा सपाट प्रदेश

१९) वारा, वायू

२१) वर्तुळाच्या परिघाचे त्याच्या व्यासाशी असलेले गुणोत्तर दर्शविणाऱ्या चिन्हाचे नाव

२२) दात

२३) भारताच्या 'चंद्रयान'चे उड्डाण या ठिकाणाहून झाले

२४) एक भारतीय वनस्पती-हिचा रंग तीन दिवस असतो असे म्हणतात

**उभे शब्द**

२) वादळी पावसाच्यावेळी आकाशात ही कडाडते

३) शालिवाहन शक कालगणनेत तीन वर्षांनी जादा मोजला जाणारा महिना

४) इस्रोमधील भारताची रॉकेट वूमन

५) पाणी आणि जमीन या दोन्ही ठिकाणी वास्तव्य करणारे सजीव

१०) मूळ भारतीय असलेले अमेरिकन नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ '----' खुराणा

११) भारतीय राजमुद्रेखाली लिहिलेले अर्थपूर्ण घोषवाक्य

१३) दंगली, महिलांवरील अत्याचार यांनी सध्या धगधगत असलेले एक राज्य

१४) सशस्त्र आणि हिंसक मार्गाने क्रांती करू पाहाणारी एक चळवळ

१८) डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना मृत्यू नंतर भारत सरकारने हा सन्मान बहाल केला

१९) एक औषधी वनस्पती

२०) चॉकलेट बनवण्यासाठी लागणारा एक पदार्थ

(उत्तर पुढील अंकात)

## विवेक-विज्ञान शब्दकोडे १३ चे उत्तर


| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १कू | ■ | २अ | ब्रा | ३ह | म | को | वृ | र | ■ |
| ■ | ४फु | ले | ■ | त्या | ■ | ■ | ■ | ■ | ५गे |
| ६अ | ले | क्झां | ड | र | ७ग्रा | ८ह | म | बे | ल |
| नि | ■ | ड | ■ | ■ | ९म | मी | ■ | ■ | अँ |
| १०ल | ह | र | ■ | ११पे | ■ | द | ■ | १२क्रो | म |
| का | ■ | क | ■ | १३र | स | द | ■ | ■ | वे |
| को | ■ | १४निं | १५द | णी | ■ | ल | ■ | १६तू | ट |
| ड | ■ | १७ग | र | ■ | १८शे | वा | ळ | ■ | ■ |
| क | ■ | १९हें | ड | २०ली | ■ | ई | ■ | २१प्या | ला |
| २२र | ही | म | ■ | २३प | क्षी | ■ | २४शिं | दे | ■ |

# विवेक निर्धार मेळावा

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त पुणे येथे एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनच्या सभागृहात निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव, प्रसिद्ध विचारवंत डॉ. राम पुनियानी, ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई, सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल, कार्याध्यक्ष माधव बावगे, प्रधान सचिव संजय बनसोडे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष अविनाश पाटील होते. अनिल करवीर, विजय नांगरे आणि साथी यांनी चळवळीची गीते सादर केली तर प्रल्हाद बोऱ्हाडे, विलास निंबोरकर, निलेश कुडाळकर, ॲड. परिक्रमा खोत, माधुरी गायकवाड, वसंत वळवी, प्रियांका खेडेकर, यश, संदिप, अनिता भोसले, एकनाथ पाठक, धर्मराज चवरे यांनी निर्धार व्यक्त केला.



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव मार्गदर्शन करताना



प्रसिद्ध विचारवंत डॉ. राम पुनियानी




ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई




महा. अंनिसचे अध्यक्ष भाई अविनाश पाटील



सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल



कार्याध्यक्ष माधव बावगे




राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे



निर्धार व्यक्त करण्यासाठी राज्यभरातून आलेले मान्यवर व कार्यकर्ते




अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका डॉ. दाभोलकर विशेषांकाचे प्रकाशन




'हम होंगे कामयाब' या गीताने निर्धार मेळाव्याची सांगता झाली

**Registered News Paper**
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष पहिले अंक बारावा, ५ सप्टेंबर २०२३ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–**
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 1 Issue 12, 5th September 2023 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
**व्यक्तीसाठी रु. ४००/–**
**संस्थेसाठी रु. ५००/–**

## वर्षभरात विशेषांकासह ११ मासिक अंक मिळवा घरपोच

वर्गणीदार तसेच देणगी/ जाहिरात देऊ इच्छिणाऱ्यांनी विवेक जागर संस्थेच्या खालील अकाउंट नंबरवर रक्कम जमा करावी.

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
वर्गणीदार/देणगीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
**ICICI Bank, Mundada Market, Dhule**
**A/c No.: 646301002757**
**IFSC Code : ICIC0006463**
**PAN : AADTV0009R**

- रक्कम जमा केल्यानंतर व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर (९३५९०८०८२०) यांच्याशी संपर्क करणे.
- आपल्या सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. पोस्टाने अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास व्यवस्थापकीय संपादकाकडे संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामामध्ये सहभागी होण्यासाठी खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.**

| राज्य प्रधानसचिव | | | | राज्य कार्याध्यक्ष | राज्य अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|
| **नंदकिशोर तळाशीलकर** | **गजेंद्र सुरकार** | **डॉ. टी. आर. गोराणे** | **संजय बनसोडे** | **माधव बावगे** | **अविनाश पाटील** |
| ९८६९१७००६२ | ९४०४८९१७२२ | ९४२०८२७९२४ | ९८५०८९९७१३ | ९४०४८७०४३५ | ८९७५१३०६०९ |

**कार्यालयीन पत्ता**

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४० (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.